आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ६ मार्च २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १९४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 6 MARCH 2024 | adhunikkesari.com | ● YEAR-03 ● ISSUE-194 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05


# व्होट बँकेसाठी ७० वर्षे रामलल्लांना तंबूत ठेवले

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा जळगावात महाविकास आघाडीवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव : यंदाच्या निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपाला संधी द्या. पंतप्रधान मोदी यांनी भारताची अर्थव्यवस्था ११ व्या नंबरवरून पाचव्या नंबरवर आणली आहे, ती आपल्याला तिसऱ्या नंबरवर न्यायची आहे. काँग्रेसला जे ७० वर्षांमध्ये जमले नाही ते आम्ही १० वर्षांमध्ये करून दाखवले आहे. त्यांनी व्होट बँकेसाठी ७० वर्षे रामलल्लांना तंबूत ठेवले. परंतु, आमच्या सरकारने रामलल्लांचे मंदिर बांधून दाखवले, असे म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.**

भारतीय जनता पार्टी सध्या देशभर लोकसभा निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी करत आहे. तसेच भाजपा नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारालादेखील सुरुवात केली आहे. यांतर्गत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची मंगळवारी जळगाव येथे सभा पार पडली. या सभेत बोलताना अमित शाह यांनी मतदारांना पुन्हा एकदा भाजपाला मत देऊन नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यास सहकार्य करा, असे आवाहन केले. तसेच शाह यांनी यावेळी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख शरद पवार यांच्यावर टीका केली. महाविकास आघाडीला तीन चाकांची रिक्षा संबोधले. ही रिक्षा पंक्चर झालेली असून महाराष्ट्राचा विकास करणार नाही, असे वक्तव्य शाह यांनी यावेळी केले.

अमित शाह म्हणाले, मी शरद पवारांना सांगेन की, नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान बनून केवळ १० वर्षे झाली आहेत. या १० वर्षांमध्ये आम्ही देशाचा खूप विकास केला. परंतु, अवघा महाराष्ट्र गेल्या ५० वर्षांपासून शरद पवारांचे ओझे वाहतोय. महाराष्ट्र त्यांना सहन करतोय. त्या ५० वर्षांचा राहू देत, परंतु तुम्ही तुमच्या पाच वर्षांचा हिशेब द्या. मी मोदी सरकारच्या काळातील दहा वर्षांचा हिशेब द्यायला इथे आलो आहे. इंडिया आघाडितले सगळे पक्ष स्वार्थी आहेत. प्रत्येक पक्षाच्या प्रमुखाला आपापल्या मुलांना मंत्री, मुख्यमंत्री आणि पंतप्रधान करायचं आहे. त्यांच्यातल्या सर्व पक्षांमध्ये घराणेशाही चालते. सोनिया गांधी यांना त्यांच्या मुलाला म्हणजेच राहुल गांधी यांना पंतप्रधान बनवायचं आहे. शरद पवारांना त्यांच्या मुलीला म्हणजेच सुप्रिया सुळे यांना मंत्री करायचे आहे. उद्धव ठाकरेंना त्यांच्या मुलाला म्हणजेच आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्री बनवायचे आहे, एम. के. स्टॅलिन यांना त्यांच्या मुलाला उदयनिधींना मुख्यमंत्री बनवायचे आहे.

अमित शाह म्हणाले, सोनिया गांधी आणि मनमोहन सिंह यांचे सरकार होते तेव्हा रोज बॉम्बस्फोट व्हायचे. दहशतवादी भारतात येऊन हल्ले करून, बॉम्बस्फोट करुन पळून जायचे. परंतु, आपल्याकडून त्यांना काहीच प्रत्युत्तर दिले जायचे नाही. मग मोदींचे सरकार आले मग उरी आणि पुलवामामध्ये अतिरेक्यांनी हल्ला केला. दहाच दिवसांत पाकिस्तानच्या घरात घुसून आपण सर्जिकल स्टाईक आणि एअर स्ट्राईक करुन आतंकवाद्यांना संपवले. आपल्या सरकारने काश्मीरचा प्रश्न सोडवला. काश्मीर आपला आहे की नाही? काश्मीर भारताचा भाग आहे की नाही? मोदींनी काश्मीरला भारताशी जोडले. काँग्रेसने कलम ३७० हे ७० वर्षांपासून लटकवत ठेवले होते. आम्ही ते काढून टाकले.



**महाविकास आघाडी पंक्चर रिक्षा :** महाराष्ट्रातली महाविकास आघाडी म्हणजे पंक्चर रिक्षा आहे. या रिक्षाची चाकं पंक्चर झाल्याने खिळखिळी झाली आहे. महाराष्ट्राला पंक्चर ऑटो विकास देऊ शकते का? तर नाही. त्यामुळे महाराष्ट्रात शिंदे फडणवीस सरकार महाराष्ट्रात उत्तम काम करतं आहे. असंही अमित शाह म्हणाले.

# गुजरातमध्ये काँग्रेसचे तीन माजी आमदार भाजपात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आगामी लोकसभा निवडणुकीला अवघे काही दिवस बाकी आहेत. काँग्रेस पक्ष लोकसभेची तयार करत असतानाच देशभरात भारतीय जनता पार्टी काँग्रेसला मोठमोठे धक्के देत आहे. महाराष्ट्रापाठोपाठ आज गुजरातमध्येही काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. पाच वेळा खासदार राहिलेल्या नारन राठवा आणि त्यांचे पूत्र संग्रामसिंग राठवा यांनी काही दिवसांपूर्वी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यानंतर आता काँग्रेस आमदार अर्जुन मोधवाडिया यांच्यासह दोन माजी आमदारांनी सोमवारी (४ मार्च) काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला होता. आज या तिघांनी अधिकृतपणे भाजपात प्रवेश केला आहे. अर्जुन मोधवाडिया यांचं पक्षातून बाहेर पडणं, हा काँग्रेससाठी मोठा धक्का मानला जातोय. काँग्रेसचे तीन माजी आमदार अर्जुन मोधवाडिया, अंबरीश डेर आणि मुलू भाई कंडोरिया यांनी भाजपात प्रवेश केला आहे. या तिन्ही नेत्यांनी आज (५ मार्च) दुपारी भाजपा



प्रदेशाध्यक्ष सी. आर. पाटील यांच्या उपस्थितीत भाजपाचं कमळ हाती घेतलं आहे. मोधवाडिया आणि डेर यांनी कालच त्यांच्या काँग्रेस सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. काही दिवसांत राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा गुजरातमध्ये दाखल होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर सोमवारी गुजरात काँग्रेसच्या वतीने सोमवारी पत्रकार परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. परंतु, या पत्रकार परिषदेला अर्जुन मोधवाडिया अनुपस्थित होते. त्यानंतर ते पक्षावर नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. अशातच सायंकाळी त्यांनी काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला आणि आज भाजपात प्रवेश केला. मोधवाडिया म्हणाले, मला काँग्रेसमध्ये गुदमरल्यासारखे होत होतं. मी गेल्या ४० वर्षांपासून काँग्रेस पक्षाबरोबर होतो. माझ्यासारख्या व्यक्तीला काँग्रेस सोडण्यासाठी भाग पाडलं जात असेल, तर काँग्रेसने यासंदर्भात विचार करायला हवा. यापूर्वी राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला (२२ जानेवारी २०२४) उपस्थित न राहण्याच्या काँग्रेसच्या भूमिकेवर अर्जुन मोधवाडिया यांनी टीका केली होती. तसेच त्यांनी या संदर्भात एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर नाराजी मांडणारी पोस्टही केली होती. त्यानंतर काही वेळाने त्यांनी ही पोस्ट डिलीट करावी, यासाठी काँग्रेसच्या तीन वरिष्ठ नेत्यांनी मोधवाडिया यांना विनंती केली. परंतु, त्यांनी पोस्ट डिलीट करण्यास नकार दिला. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून पक्षात त्यांच्याविरोधात नाराजी असल्याची चर्चा होती.

# क्षेपणास्त्र हल्ल्यात केरळचा नागरिक ठार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** उत्तर इस्रायलमधील मोशाव या ठिकाणी झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात मुळच्या केरळमधील रहिवाशाचा मृत्यू झाला. तर अन्य दोघे या हल्ल्यात जखमी झाले. मृत व्यक्तीचे नावे निबीन मॅक्सवेल असून ते कैकुलंगारा येथील रहिवासी होते. निबीन दोन महिन्यांपूर्वी इस्रायलमध्ये गेले होते. तेथे ते एका शेतात काम करायचे. जोसेफ आणि पॉल मेलवीन अशी जखमी झालेल्या अन्य दोघांची नावे आहेत. निबीन यांच्या मृत्यूबाबत कोल्लम येथील नागरिकांनी अधिक माहिती दिलीय. "भारतीय वेळेनुसार सोमवारच्या संध्याकाळी ४ वाजता ही घटना घडली. निबीन यांनी इस्रायलमधील बिघडत चाललेल्या परिस्थितीची त्यांच्या कुटुंबीयांना कल्पना दिली होती. आम्ही लवकरच अन्य ठिकाणी जाणार आहोत, असेही निबीन यांनी त्यांच्या वडिलांना सांगितले होते.

# मोदी सरकारच्या जनकल्याणकारी योजना घराघरांत पोहचविणार


## भाजपा वैद्यकीय आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक डॉ. बाळासाहेब हरपळे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

जालना : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली मागील दहा वर्षात अनेक जनकल्याणकारी योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविल्या.सामान्य नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी मोदी सरकारने आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, मातृवंदना योजना, आरोग्य वर्धिनी केंद्र यासारख्या योजना राबवून गरिबांचे आयुष्यमान उंचावण्याचा प्रयत्न केला. राजनीतीपेक्षा त्यांनी राष्ट्रनितीला अधिक महत्त्व दिले.म्हणून येणाऱ्या काळात मोदी सरकारने राबविलेल्या जनकल्याणकारी योजनांची माहिती घराघरात पोहचविणार असल्याचे प्रतिपादन भाजपा वैद्यकीय आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश संयोजक डॉ. बाळासाहेब हरपळे यांनी केले.
नुकतीच जालना येथे नमो डॉक्टर्स क्लस्टरची विभागीय बैठक संपन्न झाली.त्यावेळी डॉ. हरपळे यांनी भाजपा वैद्यकीय आघाडीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.केंद्र सरकारच्या विविध योजना रुग्णमित्राच्या माध्यमातून गावपातळीवर नेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींचे विचार प्रत्येक घरात नेण्यासाठी भाजपा वैद्यकिय आघाडी प्रयत्न करेल असेही डॉ. हरपळे म्हणाले. यावेळी भाजपा वैद्यकीय आघाडीचे मुख्य प्रदेश प्रवक्ते डॉ. स्वप्नील मंत्री,भाजपा महिला वैद्यकीय आघाडीच्या प्रदेश प्रभारी डॉ. उज्वला हाके, महिला प्रदेश संयोजिका डॉ. चंचल साबळे,प्रदेश सहसंयोजक पॅरामेडिकल विंग प्रज्ञा हातनालिकर,प्रदेश सहसंयोजक डॉ.संदीप चोपडे पाटील, जालना वैद्यकीय आघाडी जिल्हा संयोजक डॉ.श्रीमंत मिसाळ, डॉ कैलाश सचदेव, होमिओपॅथी विभागाचे प्रदेश सहसंयोजक डॉ.राम पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकपर भाषणात डॉ.स्वप्नील मंत्री यांनी नवनिर्वाचित राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडेंच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.भाजपा वैद्यकिय आघाडीतर्फे राबविण्यात येणाऱ्या सामाजिक



उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.
यावेळी भाजपा वैद्यकीय आघाडी महिला प्रदेश विंग प्रदेश संयोजक डॉ चंचल साबळे ,डॉ.उज्वला हाके यांनी वैद्यकिय आघाडीत महिलांचा सहभाग आणि महिला डॉक्टरांच्या समस्या ह्यावर विस्तृत मार्गदर्शन केले. होमिओपॅथी विभाग प्रदेश संयोजक डॉ.भालचंद्र ठाकरे यांच्या निर्देशानुसार जालना जिल्हा होमिओपॅथी विंग पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.डॉ.चोपडे यांनी जालना वैद्यकिय टीमचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या बैठकीस डॉ.विनायक काकड , डॉ गोविंद भताने, डॉ खेडेकर, डॉ ईश्वर जटाळे, डॉ अमोल गिराम, डॉ विजय सेनानी, डॉ करवा, डॉ केदार कुलकर्णी, डॉ राजकर, डॉ सुसर पाटील, डॉ.दाभेराव तसेच जालना जिल्हा भाजपा वैद्यकिय आघाडीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## स्वा. सावरकर आणि येसूवहिनी

आधुनिक केसरी

पुढे सावरकरांनाही अटक झाली. जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यावेळी ते लंडनच्या ब्रिक्स्टन तुरुंगात होते. त्यावेळी आपल्याला झालेली ही शिक्षा आपल्या वहिनीला कळवण्यासाठी त्यांनी एक पत्र लिहिले. ते पत्र ' माझे मृत्युपत्र ' म्हणून प्रसिद्ध आहे. या पत्रात ते म्हणतात
हे मातृभूमी तुजला मन वाहियेले, वक्तृत्व वाग्विभवही तुज अर्पियेले, - १
तुतेंची अर्पिली नवी कविता रसाला, लेखप्रती विषय तुंचि अनन्य झाला . - २
त्वत्स्थंडिली ढकलिले प्रिय मित्रसंघा, केले स्वयें दहन यौवन-देह्-भोगा - ३
त्वर्य नैतिक सुसंगत सर्व देवा, तत्सेवनीच गमली रघुवीर सेवा. - ४
त्वत्स्थंडिलीं ढकलिलीं गृहवित्तमत्ता, दावानलांत वहिनी नवपुत्रकांता - ५
त्वत्स्थंडिली अतुल्-धैर्य वरिष्ठ बंधू, केला हवी परमकारुण पुण्यसिंधू - ६
त्वत्स्थंडिलावरी बळी प्रिय 'बाळ' झाला, त्वत्स्थंडिली बघ आता मम देह ठेला - ७ हें काय! असतो बंधु जरी सात आम्ही, त्वत्स्थंडिलींच असते दिधलें बळी मी - ८ या ओळी संस्कृतप्रचुर आहेत. पण त्यातील अर्थ खूप सुंदर आणि उदात्त आहे. सावरकर म्हणतात ' हे मातृभूमी मी तुला माझे सर्वस्व अर्पण केले आहे. माझे मन, माझी कविता, माझे मित्र, माझे तारुण्य, माझे शरीर, माझे भोग असे सर्व काही. माझे घरदार, संपत्ती, माझी वहिनी , माझी पत्नी माझे बंधू हे सगळे काही मी तुझ्या स्वातंत्र्यासाठी सुरु असलेल्या यज्ञात समिधा म्हणून अर्पण केले आहे. आम्ही तीनच भाऊ आहोत, पण सात जरी असतो, तरी आम्ही सगळ्यांनी तुझ्यासाठी आपले जीवन अर्पण केले असते. केवढा उदात्त विचार. तरुण वयात हा केवढा त्याग ! जो काळ हौसमौज करण्याचा, आनंदाचा, तो त्यांनी देशसेवेसाठी अर्पण केला. या त्यागाला तुलना नाही. याच पत्रात ते पुढं म्हणतात की घेतले व्रत न हें अम्हि अंधतेने, लब्ध-प्रकाश इतीहास्-निसर्ग-मानें आम्ही हे निखाऱ्यांवर चालण्याचे, काटेरी मार्गावर चालण्याचे व्रत जाणीवपूर्वक घेतले आहे. आमच्या देशाच्या इतिहासाला आणि कीर्तीला शोभून दिसावे असेच ते आहे. या सगळी दरम्यान येसूबाई आजारी झाल्या. आपल्या कुटुंबासाठी आणि देशासाठी प्रचंड त्याग करणारी ही माउली आपल्या पतीचे एकदा तरी दर्शन व्हावे म्हणून आसुसली होती. त्यासाठी इंग्रज सरकारकडे त्यांनी अनेक अर्ज केले होते. परंतु ते अर्ज फेटाळण्यात आले. त्यांना बाबाराव तुरुंगातून सुटून आल्याचा सारखा भास होऊ लागला.



## आनंदी पहाट

# सकारात्मकतेने प्रत्येक क्षण विलक्षण करत राहावा

आधुनिक केसरी

प्रत्येकाची बालपणापासूनच स्वतःच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, सामाजिक विकासासाठी, कौटुंबिक उन्नतीसाठी, आर्थिक विकासासाठी धडपड सुरु असते. प्रत्येकजण यशप्राप्तीच्या दृष्टीकोनातून सतत प्रयत्न करत असतो. व्यक्तिगत गरजा, कौटुंबिक जबाबदाऱ्या, भविष्यासाठी तरतुदी इत्यादी अनेकविध कारणांसाठी प्रत्येकाचाच कस लागत असतो. अर्थात ह्या प्रयत्नांत काही सफल होतात, तर काहींना अधिक प्रयत्न करत राहावं लागतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या प्रत्येकाला यश मिळतंच; फरक इतकाच कि, काहींना ते ओंजळभर मिळतं, तर काहींना रांजणभर. त्या यशापेक्षाही मिळणारा आनंद मोठा आणि महत्वाचा असतो, हे समजून घेणं आवश्यक आहे. ह्या यशप्राप्तीसाठी प्रत्येकाला निरनिराळ्या प्रकारचा संघर्ष देखील करत राहावा लागतो. आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर निराळा संघर्ष असला तरीही प्रत्येकाला कमी-अधिक प्रमाणांत करावाच लागतो. संघर्षाचं स्वरूप वयोगटानुसार बदलत जातं. बालपणीचे संघर्ष अनेकदा शारीरिक / प्राकृतिक स्वरूपाचे असतात. तरुणांना मानसिक आणि आर्थिक पातळीवर संघर्षांचा सामना करावा लागतो. वृद्धोपकाळांत हे संघर्ष स्वास्थ्यासाठी / आयुरारोग्य लाभण्यासाठी करावे लागतात. थोडक्यात, संघर्ष नाही असा माणूस सापडणे विरळाच. प्रत्येक संघर्षाला धीरानं आणि चिकाटीनं तोंड देऊन त्यांवर मात करणं, यश आणि आनंद प्राप्त करणं जरुरीचं असतं. गरज असते वैचारिक बैठकीत स्वतःचा समावेश करण्याची, सकारात्मक विचारांचं आदान-प्रदान करण्याची. त्यासाठी यशप्राप्तीच्या योग्य मार्गाचं दर्शन घडवणारी व्यक्ती भेटणे आवश्यक असतं आणि अशी व्यक्ती भेटणे उपयुक्त देखील ठरतं.




आधुनिक केसरी

## ज्ञानाचा प्रताप | संतरूप (अद्वैती हा) ||

टेकविता माथा | संत चरणासी ||
भस्म झाल्या राशी | पातकांच्या ||१||
उजळे अंतरी | ज्ञान ज्योत आता ||
सटवाई माता | तुझ्या कृपे ||२||
लाभला भाग्याने | सात्विकांचा संग ||
होऊनी निस्संग | लीन झालो ||३||
क्षुधा तृष्णा गेली | आली मना जाग ||
आता मौनराग | आळवितो ||४||
विटेवरी दिसे | विराट स्वरुप ||
ज्ञानाचा प्रताप | संतरूप (अद्वैती) ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



हि
त
गु
ज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)

## मृगजळाचा पाठलाग


गीतेवर प्रवचन, कीर्तन, ग्रंथलेखन, श्रवण, पारायण या सर्वांमागे एक उदात्त हेतू असतो.मानवाला  अध्यात्मात उन्नत करून त्याला स्वस्वरूपाची ओळख करून देणे असा तो हेतू आहे.य भ्रष्टाचार, दुराचार,कृत्रिम टंचाई, दारिद्र्य,महागाई, गुंडगिरी,दहशतवाद, नीतिमत्तेचा ऱ्हास,अशा अनंत राक्षसांनी ही सुंदर वसुंधरा   त्रस्त आहे. भारतासारख्या पावनभूमीत सुद्धा या राक्षसांचा  नाच चालू आहे. देहसुख हेच प्राधान्य असलेल्या पराकोटीच्या ढोंगी तत्त्वज्ञानाने चंगळ वाद माजला आहे.मुले व तरुण मुले त्यामुळे संस्काराला स्वतःला परखी होऊन खोट्या मृगजळा मागे धावत आहेत.भोगवादी संस्कृतीची चटक माणसाला लागली आहे.माणसाच्या रक्ताची चटक  दुसऱ्या माणसाला लागली आहे.हे सर्व महाभयंकर आहे. हे सर्व थांबले पाहिजे आणि ते थांबविण्याची ताकद फक्त गीतेत आहे. पृथ्वी,आप,तेज,वायू,आकाश या पंचमहाभूतांचा उपयोग करून मानवाने वैज्ञानिक प्रगती साधली आहे. हे सर्व परमेश्वरानेच निर्माण केले आहे याचा मानवाला विसर पडला आहे. त्याने निर्माण केलेली ही तत्वे  इतकी बळकट आहेत तर स्वतः परमेश्वर किती सामर्थ्यवान असेल याचा मानव जातीला विसर पडलेला दिसतो. आजची महाभयंकर परिस्थिती पाहता गीता हाच आधार वाटतो आणि म्हणूनच प्राचीन काळातील महर्षी वेदव्यासांपासून आधुनिक काळातल्या रमण महर्षी पर्यंत अनेक ऋषीमुनींनी तसेच ज्ञानोबांपासून विनोबापर्यंत अनेक  साधू संतांनी, अनेक सद्गुरूंनी गीता सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. गीतेमुळे आत्मोन्नतीचा सात्विक मार्ग प्रत्येकाला दिसेल. प्रत्येकाचे अंतकरण उजळून जाईल आणि त्यामुळे आपले अंतकरण पावन होईल याबाबत तिळ मात्र शंका नाही.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मन अरु पवन विलीन में,
फूलै कमल अनूप ।
फूले से खूले नयन, दरशन शब्द स्वरुप ।।४१ ।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम अध्याय) ०२/०१/४१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद:
मन आणि प्राण विलय व शांत झाल्यावर अष्ट कमल प्रफुल्लित होतात आणि कमल विकसित झाल्यावर ऊर्ध्व दृष्टी खुली होऊन शब्द स्वरूप परब्रह्माचे दर्शन होते. मन आणि प्राण शांत झाल्यावरच शुद्ध रूपाने अंतरदृष्टी उघडते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज


.................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# प्रपंचातले सुख-दु:ख हे केवळ जाणिवेत आहे

आधुनिक केसरी

प्रापंचिकाच्या मनात नेहमी एक शंका येते की, खोटे करूनसुद्धा जर सुखी होता येते तर तसे करायला काय हरकत आहे ? सन्मार्गाने गेला तरी माणूस दुःखी का होतो, अशीही शंका आपल्याला येते. मी देवाला भिऊन वागलो, का, तर प्रपंच सुखाचा व्हावा म्हणून. देवाची एवढी खटपट करूनही जर सुखी होता येत नाही तर काय उपयोग ? किती विचित्र आहे पाहा, खेळातले घर बांधायला आपण गवंडी बोलावण्यासारखा हा प्रकार आहे ! प्रपंचात दक्षता ठेवणे जरूर आहे; ते जर आपण केले नाही तर देवाने काय करावे ? भगवंताचा ‘साधन’ म्हणून आपण उपयोग करतो, आणि शेवटी साधनालाच दोष देतो, साध्य बाजूलाच राहते. भगवंत विषय देईल, पण त्याबरोबर त्याचे दुःखही देईल. एकजण मारुतिरायाला सांगून चोरी करीत असतो. तो एकदा पकडला गेला आणि त्याला शिक्षाही झाली; तेव्हा तीही मारुतीच्या संमतीनेच झाली असे नाही का ? ‘मी कोण’ हे जोवर आपण ओळखत नाही तोवर, वैभवाच्या शिखरावर जरी गेलो तरी आपल्याला



समाधान मिळणार नाही. ज्याच्यापासून प्रपंच झाला, त्याला ओळखता आले पाहिजे. देहच सत्य नाही तर त्यावर उभारलेली इमारत कुठून सत्य असणार ? ठिगळे लावून आपण आपला प्रपंच करतो; मग त्यात कमतरता आल्याशिवाय नाही राहात ! कोळसा उगाळून पांढरा रंग मिळेल हे म्हणणे जसे वेडेपणाचे आहे, तसे प्रपंचात सुख मिळवीन हे म्हणणे आहे. सुखदुःख हे जाणिवेत आहे. आपल्याला मिळायचे तेवढेच मिळते, पण आपले हवे-नकोपण, म्हणजे आपली वासना, गेली की सुखदुःख राहात नाही. वासना मारायला, भगवंताचे अधिष्ठान हाच एक उपाय आहे. वासना ही लाडावलेल्या कुत्र्याप्रमाणे आहे, तिला नुसते हड्हड् करून ती बाजूला जात नाही. पण तेही बरोबरच आहे, कारण आपणच तिला लाडावून ठेवले आहे, म्हणून भगवंताच्या पूजेच्या वेळीसुद्धा ती देवघरात येते. शिवाय, वाईट वासनेमध्ये चांगल्या वासनेला मारण्याचे बळ आहे, कारण आपण स्वतः वाईट वासनेच्या बाजूचेच आहोत ! वासना ही कोणत्याही उपायांनी तृप्त होण्यासारखी नसून, आपण जर भगवंताजवळ ‘वास’ ठेवला तरच ती नष्ट होते. ‘मी कर्ता नसून परमात्मा कर्ता आहे’ अशी भावना झाल्याशिवाय मन भगवंताला अर्पण होणार नाही; ते अर्पण झाल्याशिवाय फळाची अपेक्षा सुटणार नाही; आणि फळाची अपेक्षा सुटल्याशिवाय जीवाला शांती मिळणार नाही.
८७. वासना म्हणजे देवाच्या विरूद्ध असलेली आपली इच्छा.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

हिरण्यगर्भो भूगर्भो माधवो मधुसूदनः
विष्णुसहस्त्रनाम म्हणाताना या एका ओळींची आठवण आली. सबंध विश्वाला व्यापून रहाणारी व धारण करणारी मोठी जाणीव आहे तिला हिरण्यगर्भो किंवा ओंकार म्हणतात. ऋग्वेदात असा मंत्र आहे. *हिरण्यगर्भ ःसमवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत्*
अर्थ---विश्व उत्पन्न होण्यापूर्वी हिरण्यगर्भ एकटाचं होता. तोच सगळ्या विश्वाचा स्वामी आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ६ मार्च २०२४
adhunikkesari.com

# नगर दक्षिणमध्ये महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची 'तुतारी' वाजवा

## खा. डॉ. अमोल कोल्हे यांचे आ. नीलेश लंके यांना साकडे !

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**अहमदनगर :** लोकनेत्याला वाढदिवसाचे गिफ्ट द्यायचे असते पण मी मागतोय. महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी, दिल्ली तख्खाला घाम फोडणारा असेल असा आमच्या खांद्याला खांदा लावणारा खासदार संसदेत पाठवा. जबाबदारी तुमची सर्वांची आहे. लोकनेते नीलेश लंके यांनी लवकरात लवकर निर्णय घ्यावा. आई जगदंबकडे हिच प्रार्थना आहे की महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची तुतारी नगर दक्षिणमध्ये वाजावी अशी अपेक्षा करीत खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी आ. नीलेश लंके यांना शरद पवार गटाकडून लोकसभेची निवडणूक लढविण्यासाठी साकडे घातले.

नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवपुत्र संभाजी या महानाट्याच्या शेवटच्या प्रयोगानंतर खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी मा. आ. राहुल जगताप, रावसाहेब खेवरे, शशिकला अनिल राठोड, शरद झोडगे, राजेंद्र पिपाडा, डॉ. सुधा कांकरिया, संदेश कार्ले, नितीन धांडे, राणा प्रताप पालवे, विक्रम राठोड, मा. महापौर सुरेखा कदम, अशोक कानडे, अंबादास शिंदे, बाबासाहेब भिटे, वैशाली टेके, राजू शेटे, बाळासाहेब हराळ, गिरष जाधव, दिलीप झिंजुर्डे, राजेंद्र भगत, विजय पठारे, सिताराम काकडे मच्छिंद्र सोनवणे, धनराज गाडे, नितीन बाफना, सुधाकर मुसमाडे, रामदास बाचकर, किरण कडू यांच्यासह लाखोंचा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता. महानाट्यादरम्यान प्रियांका शेळके पाटील यांनी सूत्रसंचलनाची जबाबदारी पार पाडली. आ. नीलेश लंके यांच्या सामाजिक कार्याचा मला कायम अभिमान वाटत असल्याचे सांगत डॉ. कोल्हे म्हणाले, कुठलीही राजकिय पार्श्वभुमी नसताना जेंव्हा सर्वसामान्य कुटूंबातील माणसं जनतेच्या काळजावर आपले अधिराज्य गाजवतात त्याचा अभिमान प्रत्येकाला वाटतो. या महानाटयास लाखोंच्या संख्येने उदंड प्रतिसाद दिल्याबद्दल नगरकरांप्रती कोल्हे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. लाखोंच्या संख्येने दररोज प्रेक्षक असताना ज्या पध्दतीने आ. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली जे नियोजन केले ते खरोखर वाखाणण्यासारखं होतं असे सांगत कोल्हे यांनी नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या सदस्यांचे कौतुक केले. डॉ. कोल्हे पुढे म्हणाले, माझ्या शिरूर मतदार संघात विरोधक मला घेण्यासाठी येत असताना तुम्ही नगरमध्ये येऊन महानाटयाचे प्रयोग का करता असे पत्रकारांनी मला विचारले असता पद, राजकारण सगळे बाजूला. छत्रपती सर्वोच्च आहेत आणि त्यांचा इतिहास प्रत्येक नागरीकापर्यंत पोहचला पाहिजे. छत्रपतींचा केवळ जयजयकार करून चालणार नाही तर छत्रपतींचा धगधगता इतिहास जो तुम्ही अनुभवला तो इतिहास काय प्रेरणा देतो ? या धगधगत्या इतिहासाने हीच प्रेरणा दिली की महाराष्ट्राचा स्वाभिमान दिल्लीच्या तख्खासमोर झुकत नाही, झुकणार नाही असे कोल्हे यांनी सांगितले.



**संसदेत डरकाळी फोडणारे वाघ पाठवायचेत :** गेल्या काही दिवसांपासून आपण सातत्याने जे राजकीय चित्र पहतो आहोत. कांद्यावर निर्यात बंदी आली, सोयाबिनचे भाव पडले, कापसाचे भाव पडले. महाराष्ट्रातून ४८ खासदार लोकसभेत निवडूण जातात. त्यातील सत्ताधारी व त्यांच्या मित्र पक्षांचे ३९ खासदार तोंड मिटून, मुग गिळून गप्प बसतात. आपल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी कुणी भांडत नाही. तरूणांच्या नशिबातील रोजगार हिरावले जातात. रोज एक उद्योग महाराष्ट्रातून पळविला जातो, कोणीही बोलत नाही. महापुरूषांचा अवमान मागच्या काळात करण्यात आला, कोणीही बोलले नाही. तर मग प्रश्न पडतो की येणाऱ्या लोकसभेत दिल्लीतून गुबूगुबू वाजल्यानंतर माना हालविणारे नंदीबैल पाठवायचेत की महाराष्ट्राच्या स्वाभिमानासाठी डरकाळी फोडणारे वाघ पाठवायचेत. **खा. डॉ. अमोल कोल्हे**



**आ. लंके यांनी साकारली भूमिका !** :महानाटयाच्या शेवटच्या दिवशी आ. नीलेश लंके यांनीही भूमिका साकारली केली. महानाटयातील राज्याभिषेक सोहळयाच्या प्रसंगात छत्रपती संभाजींसोबत सरदारांच्या भूमिकेत आ. नीलेश लंके झळकते. सरदाराचा पोषाख परिधान केलेल्या आ. लंके यांच्या हातात तलवारही होती.



# श्री क्षेत्र त्रिवेणीश्वर येथे महाशिवरात्री उत्सवाला धर्म ध्वजारोहणाने प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** तालुक्यातील हंडीनिमगाव व सुरेशनगरच्या मध्यावर असलेल्या श्री क्षेत्र त्रिवेणीश्वर येथे महाशिवरात्रीच्या पंचदिनात्मक उत्सवाला स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज,महंत ऋषिनाथजी महाराज, स्वामी रमेशानंदगिरीजी महाराज व आमदार शंकरराव गडाख यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण करून उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ करण्यात आला. यावेळी "हर हर महादेव" "त्रिवेणीश्वर  भगवान की जय"अशा जयघोषाने त्रिवेणीश्वरचा परिसर दुमदुमला होता.

यावेळी झालेल्या धर्म ध्वजारोहणाच्या कार्यक्रम प्रसंगी देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज,सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमाचे महंत उद्धवजी महाराज मंडलिक, त्रिवेणीश्वर  देवस्थानचे महंत रमेशानंदगिरी महाराज,मध्यमेश्वर देवस्थानचे महंत ऋषिनाथजी महाराज,शिनाई देवस्थानचे महंत आवेराज महाराज,आमदार शंकरराव गडाख, ज्योतिषशास्त्र तज्ञ बाळकृष्ण महाराज कुलकर्णी यांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात धर्म ध्वज पूजन करण्यात येऊन ध्वजारोहण करण्यात आले.

मिरवणुकीचा समारोप त्रिवेणीश्वर मंदिराच्या समोरील प्रांगणात झाल्यानंतर हर हर महादेवच्या गजरात धर्म ध्वजारोहण करण्यात आले त्यानंतर सर्व मान्यवरांनी स्वयंभू त्रिवेणीश्वर व भक्त प्रल्हाद महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेतले.

या प्रसंगी बोलताना आमदार शंकरराव गडाख म्हणाले की समाजासाठी निधी दिल्याने काहीही कमी पडत नाही, त्रिवेणीश्वरला सभामंडप दिला या पुढे ही जसजसा निधी उपलब्ध झाल्यास तसतशी मदत करत राहू धार्मिक कार्यातून समाजाचे दुःख हलके होत असल्याने नेवासा तालुक्यातील देवालये वैभवशाली करण्याचा आपला प्रयत्न राहील असे सांगून त्यांनी महाशिवरात्रीच्या पंचदिनात्मक सोहळयाला शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की महाशिवरात्रीच्या उत्सवाचा पर्वकाळ आजपासून सुरू झाला आहे,गावगावच्या माता भगिनींची सोहळयात असलेल्या उपस्थितीमुळे हा परमार्थ दिवसेंदिवस फुलत चाललेला आहे, शिवभक्तीच्या केलेल्या नामस्मरणाने इच्छापूर्ती लवकर होते,जीवनात केलेले कर्म आपल्याला शोधत येते व एक दिवस असा येतो की आपल्या जीवनाची फलश्रुती चांगल्या कर्माच्या पुण्याईने होते,धार्मिक कार्यात वेळोवेळी देत असलेल्या योगदानाबद्दल त्यांनी आमदार शंकरराव गडाख यांच्यात कार्याचे कौतुक केले व महाशिवरात्री उत्सवाच्या भाविकांना शुभेच्छा दिल्या. झालेल्या कार्यक्रम प्रसंगी समाज कल्याण समितीचे माजी सभापती राजेंद्र वाघमारे, सुरेशनगरचे सरपंच कल्याणराव उभेदळ, हंडीनिमगावचे सरपंच भिवाजीराव आघाव,अण्णासाहेब जावळे, जनार्धन पटारे, लोकनेते मारुतराव घुले पाटील पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन सुरेशराव उभेदळ, होमगार्ड तालुका कमांडर पत्रकार बाळासाहेब देवखिळे, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब साळुंके,अँड.कल्याण पिसाळ, जनसेवक दिनकरराव गर्जे,सौदाळयाचे सरपंच शरद आरगडे,जनार्धन पटारे,पी आर जाधव,उपसरपंच नाथा बाबर,विठ्ठल पाषाण, कुंडलिक दादा चिंधे,अँड. सारंगधर,मनोहर जाधव,गोरख गुंजाळ,संभाजी शिंदे, संपतराव पिसाळ,  शिवभक्त विष्णू नाबदे,ज्ञानेश्वर कुटे यांच्यासह भाविक सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदर्श शिक्षक डॉ.रेवणनाथ पवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थित मान्यवरासह भाविकांचे आभार मानले.उपस्थित भाविकांना अशोक गांधी यांच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान मिळत असलेला प्रतिसाद उल्लेखनीय : औताडे

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश कांबळे**

**ठाणे :** कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान विविध घटकातील नागरिकांकडून मिळत असलेला उल्लेखनीय प्रतिसाद पाहूनच केंद्रातील सत्ताधाऱ्यांकडून या न्याय यात्रेला अडथळे आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सेवादल अध्यक्ष विलासरावजी औताडे यांनी केला.ठाणे शहरातही भारत जोडो न्याय यात्रा 16 मार्च रोजी पोहोचत असून या यात्रेत सेवादल महत्वाची भूमिका बजावणार असल्याची माहिती त्यानी या प्रसंगी दिली.ठाणे शहर (जिल्हा) सेवादल अध्यक्षपदी रविंद्र कोळी यांची निवड करण्यात आली असून त्यांच्या पदग्रहण सोहळा महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सेवादल अध्यक्ष विलासरावजी औताडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सरचिटणीस मनोज शिदे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सेवादल उपाध्यक्ष शेखर पाटील, शहर कॉंग्रेसचे मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे, ओ.बी.सी.विभाग अध्यक्ष राहुल पिंगळे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस सेवादल उपाध्यक्ष प्रकाश पेवेकर, प्रदेश महिला सेवादल अध्यक्ष सविता जाधव,ग्रामीण कॉंग्रेस सेवादल अध्यक्ष प्रकाश भांगरत,प्रदेश कॉंग्रेस सदस्य सुखदेव घोलप,जे. बी.यादव,प्रदेश सहकार विभाग उपाध्यक्ष शैलेश शिंदे,महिला कॉंग्रेस अध्यक्ष स्मिता वैती,असंघटीत कामगार अध्यक्ष सदिप शिंदे आदि मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना प्रदेश कॉंग्रेस सरचिटणीस मनोज शिंदे यांनी सागितले की रविंद्र कोळी यांच्या सारख्या अनुभवी कार्यकर्त्यांवर सेवादल कॉग्रेस ची जबाबदारी दिल्यामुळे कॉंग्रेस पक्षाला अधिक बळकटी आली असून याचा प्रत्यय लवकरच आपल्या समोर दिसेल असे सांगितले या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्त्ये सहभागी झाले होते.



# 'मेफेड्रोन' प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी :** ४४ किलो ७९० ग्रॅम किलो वजनाचे ४४ कोटी ७९ लाख ८० हजार रुपयांचे मेफेड्रोन अमली पदार्थासह अटक केलेल्या पिंपरी-चिंचवड पोलीस दलातील एका पोलीस उपनिरीक्षकाला निलंबित करण्यात आले आहे. तर, दोन पोलीस कर्मचाऱ्यांना ासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. पिंपळेनिलख रक्षक चौकात हॉटेल कामगाराकडून दोन कोटी रूपये किमतीचे मेफेड्रोन (एमडी) अमली पदार्थ जप्त केल्यानंतर या प्रकरणात निगडी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक विकास शेळके याला अटक करण्यात आली आहे. त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात मेफेड्रोन कोठून आणले याची विचारणा पोलिसांनी केल्यावर नमामीने निगडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस उपनिरीक्षक शेळके याचे नाव घेतले.

# एलॉन मस्कच्या अडचणी

आधुनिक केसरी

टेस्ला कंपनीचे सर्वेसर्वा एलॉन मस्क हे जगातील सगळ्यात श्रीमंत व्यक्तींपैकी एक आहेत. २०२२ साली जेव्हा त्यांनी एक्स (ट्विटर) हे ॲप विकत घेतले, तेव्हा त्यांनी कंपनीमध्ये अनेक मोठे बदल केले. त्यातील एक मोठा निर्णय म्हणजे कंपनीचे तत्कालीन सीईओ पराग अग्रवाल यांना काढून टाकणे हा होता. तर आता एक्स (ट्विटर) च्या काही माजी अधिकाऱ्यांनी एलॉन मस्कला कोर्टात खेचले आहे. ट्विटर खरेदी केल्यानंतर काही अधिकाऱ्यांना त्याने कामावरून काढून टाकले होते. तर आता या माजी अधिकाऱ्यांनी एलॉन मस्क विरोधात खटला दाखल केला आहे. यामध्ये कंपनीचे माजी सीईओ पराग अग्रवाल यांचाही समावेश आहे. माजी अधिकारी दावा करतात की, ऑक्टोबर २०२२ मध्ये एक्स (ट्विटर) वर नियंत्रण मिळवून मस्कने कंपनी USD ४४ अब्ज, USD ५४.२० प्रति शेअरमध्ये विकत घेतली होती. त्यांच्या योजनांमध्ये एक्स (ट्विटर)च्या संपादन किमतीवर एक वर्षाचा पगार आणि अनव्हेस्टेड स्टॉक अवॉर्ड्स Valued चा समावेश होता. पण, नोकरीवरून काढून टाकल्यानंतर भरपाई म्हणून दिली जाणारी रक्कम चक्क १२८ मिलियन डॉलर्स पेक्षा जास्त एलॉन मस्कने अजूनही दिली नसल्याचे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे आणि एक्स (ट्विटर) चे माजी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एलॉन मस्क यांना कोर्टात खेचले आहे. सोमवारी काही अधिकाऱ्यांनी कोर्टात एलॉन मस्क यांच्या विरोधात खटला दाखल केला आहे. यामध्ये एक्स (ट्विटर)चे माजी सीईओ पराग अग्रवाल, माजी सीएफओ नेड सेगल, माजी चीफ लीगल ऑफिसर (मुख्य कायदेशीर सल्लागार) विजया गड्डे आणि माजी जनरल काउंसिल सेन एजेट यांचा समावेश आहे. २०२२ मध्ये ज्या दिवशी मस्कने एक्स (ट्विटर) खरेदी केले, तेव्हा या अधिकाऱ्यांना विनाकारण काढून टाकण्यात आले होते. कॅलिफोर्नियाच्या नॉर्दर्न डिस्ट्रिक्टमधील फेडरल कोर्टात दाखल करण्यात आलेल्या खटल्यात म्हटले आहे की, कोणतेही बिल न भरणे हा मस्कच्या स्वभावाचा एक भाग आहे. लोकांचे पैसे अडकवून ठेवून एलॉन मस्क इतरांना कोर्टाचे दरवाजे ठोकण्यास भाग पडतो. आपल्यावर कोणतेही नियम लागू होत नाहीत असे त्याला वाटते, असे माजी अधिकारी म्हणत आहेत. मस्कने आधी ट्विटर खरेदी करण्याचा निर्णय घेतला, मात्र नंतर तो डीलमधून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत होता. यावेळी ट्विटरच्या स्टेकहोल्डर्सची बाजू माजी अधिकाऱ्यांनी धरली होती, त्यामुळे एलॉन मस्कला ट्विटर खरेदी करावे लागले. कारण त्याला त्यांचे विभाजन द्यायचे नव्हते. माजी अधिकारी म्हणतात की, एलॉन मस्कने खोटे कारण दिले आणि त्याचा निर्णय कायम ठेवण्यासाठी विविध कंपन्यांचे कर्मचारी नियुक्त केले. एलॉन मस्क त्याच्याशी असहमत असलेल्या कोणावरही कठोर कारवाई करण्यासाठी आपली संपत्ती आणि शक्ती वापरतो, असे यावेळी माजी अधिकाऱ्यांनी खटला दाखल करताना सांगितले आहे.

# लग्न संस्था, कुटुंब संस्था, लिव्ह इन...

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

**लग्न संस्था, कुटुंब संस्था यापुढे टिकतील का?कुटुंबातली वीण घट्ट राहील की अशीच हळू हळू उसवत जाईल? या प्रश्नाचे नकारात्मक उत्तर देणे सध्या जड जात असले तरी अवती भवती जे काही चालले आहे ते बघता,भविष्यातील स्थिती चिंता जनक वाटते खरी. आताच्या कुटुंब संस्थेत पूर्वी सारखा ओलावा राहिलेला नाही हे कटू सत्य मान्य करावेच लागेल. आपली नाती, आपली संस्कृती,आपले विचार यांचे आता पर्यंत आपण गोडवे गात होतो. पाश्चात्य संस्कृती, त्यांचे आचार विचार यांना नावे ठेवीत होतो. आता आपण हळू हळू त्याच्या वाटेने चालायला लागलो. घर घर राहिलेले नाही. घराची धर्मशाळा कधी झाली हे आपल्याला कळलेच नाही.**

एकत्र राहण्यात आनंद नाही.दुरून डोंगर साजरे ही मनोवृत्ती.आई वडील,भाऊ बहिणी,नणंद भावजय,सासू सासरे,मित्र मैत्रिणी कुठल्याच नात्यात रेशीम बंध नाहीत.जे काही टिकून आहे ते समाजाच्या भीती मूळे.लोक लाजेस्तव!जबरदस्ती म्हणून..नैसर्गिक असे काहीच राहिले नाही.उरला आहे केवळ उपचार,व्यवहार! कुटुंब संस्था अन् लग्न संस्था या परस्परावलंबी संज्ञा आहेत.लग्ना मूळे कुटुंब तयार होते.विविध नात्याची वीण तयार होते. लग्न टिकले तर कुटुंब टिकते.स्थिर राहते.पूर्वीची लग्न टीकायची.आवडो न आवडो,पटो न पटो,नाती निभावून नेण्या कडे कल होता.स्त्रिया पुरुषावर अवलंबून होत्या.घर,मुले,संसार या पलीकडे महिलाना दुसरे विश्व माहिती नव्हते.शिक्षण,सामाजिक कार्य,नाटक,चित्रपट यात सहभागी स्त्रियांची संख्या तशी मर्यादितच होती.बहुतेक महिला साठी घराचा उंबरठा हीच लक्ष्मण रेषा होती.पण स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार झाला.अनेक दालन स्त्रियांसाठी खुली झालीत.चूल मुलं या पलीकडचे विश्व ,आकाश स्त्रियांसाठी खुले झाले.स्त्रिया शिकून कमवायला लागल्या.परावलंबित्व संपले.पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्री प्रत्येक क्षेत्रात आपले स्वतंत्र स्थान निर्माण करण्यात सक्षम झाली.जे घर,कुटुंब आधी फक्त कर्त्या पुरुषावर अवलंबून होते,तिथे स्त्रीचा हातभार लागल्याने सुबत्ता आली.आर्थिक स्थैर्य आले.आधी मर्यादित क्षेत्र हळू हळू विस्तारले.आता तर असे एकही क्षेत्र उरले नाही जिथे स्त्रियांना दरवाजे उघडे नाहीत.हा बदल एकाएकी झाला नसला तरी त्याचे स्वावलंबी स्वातंत्र्य मात्र वेगाने विकसित होत गेले. त्या बोलायला लागल्या. बाहेर जायला लागल्या.स्वतंत्र झाल्या.त्यांना पंख लाभले.आकाश मोकळे झाले. आता घरात वाद व्हायला लागले.भांड्याला भांडे वाजायला लागले.पूर्वी कर्ता पुरुष म्हणेल ती पूर्व दिशा.आता घरात लहान मोठा,स्त्री पुरुष ,सारेच हिरीरीने मत व्यक्त करायला लागले.आम्ही ऐवजी मी,आमचे,तुमचे अशी भाषा बदलली. कुटुंब विस्कळीत व्हायला लागले. कुटुंबाचा पाया लग्न..आधी मोठेच सारे काही ठरवायचे. मुलांनी ऐकायचे.ते प्रौढ बालविवाह झाले.म्हणजे फक्त वय वाढले.पण मुलाला,मुलीला स्वतंत्र मत नव्हते.आई वडील ठरवतील त्याच्या गळ्यात निमूटपणे माळ घालायची.हे हळू हळू बदलत गेले. मुली शिकल्या.घरा बाहेर पडल्या.विचाराने,आर्थिक क्षमतेने स्वतंत्र झाल्या. मुलेही नोकरी निमित्त बाहेर पडली.आता त्यांचे मत महत्वाचे ठरले.क्वचित मुलं मुलींनीच ठरवायचे अन् पालकांनी माना डोलवायच्या असेच व्हायला लागले.एव्हढेच नव्हे तर विवाह सोहळ्याचे रंग रूप बदलले.त्याचे इव्हेंट मॅनेजमेंट झाले.हाती भरपूर पैसा आल्याने लाखो करोडो रुपये खर्च करून थीम मॅरेज,डेस्टिनेशन मॅरेज,प्री वेड शूटिंग,डेटिंग हे सारे नाटक सुरू झाले. आपल्या जुन्या चाली रीती,विवाह संस्कार,सगळे कसेतरी उरकले जाऊ लागले..सप्त पदीच्या वेळी दिलेली वचने,आणा भाका ,होम हवन पटापट उरकायचे.संगीत,मेहेंदी, हळद,ब्याचलरस पार्टी,महागडे रिसेप्शन यातच रमायचे. विवाहा मागचे पावित्र्यच नष्ट झाले. पायाच भुसभुशीत असला तर इमारत टिकणार कशी? चार दिवसांचे सोहळे,अन् चार घटकाची मजा हे संपले की एकमेकाचे असली रूप परस्परा समोर उघडे नागडे व्हायला लागले.मतभेदाला छोटी,क्षुल्लक करणे देखील पुरेशी ठरतात आजकाल. आपण परदेशात घटस्फोट होण्याची कारणे वाचतो,ऐकतो..नवरा झोपेत घोरतो म्हणून घटस्फोट..बायको नीट नेटकी राहत नाही म्हणून घटस्फोट! आपल्याकडेही हेच वारे पसरले.आता नव्हे,फार पूर्वी एका अनुरूप लग्न संस्थेच्या मुलाखतीत क्रिकेट समालोचक हर्षा भोगले चा किस्सा आठवतो.तो म्हणाला,लग्ना साठी पत्रिका, छत्तीस गुण वगैरे बघण्या आधी बायकोला बेडरूम चा पंखा किती स्पिडचा लागतो,किंवा नवऱ्याला ए सी कितिवर ठेवला की चालतो हे आधी बघा.लग्न टिकण्या साठी पत्रिके पेक्षा बेडरूम चे टेंपरेचर दोघांच्या दृष्टीने जास्त महत्वाचे आहे! पूर्वी नवरा बायकोत मतभेद झालेत तर दोन्ही घरची वडील मंडळी सांभाळून घ्यायची.दोघानाही समजावायची.आता उलट दोन्ही आई वडील स्वतःच मतभेद वाढवतात.आग विझवण्यासाठी प्रयत्न करायचे सोडून आगीत तेल टाकतात! तू नाही तो और सही ह्या धोरणाने चालतात.पहिल्या पाच वर्षात मुले झाली अन् मग मतभेद वाढले की गुंतागुंत अधिकच वाढते. लहान मुलाच्या मानसिकतेचा गंभीर प्रश्न असतो.पण आजकालची जोडपी तोही विचार करीत नाहीत.आपले सुख,स्वातंत्र्य,स्वार्थ हे जास्त महत्वाचे..बाकी दुनिया जाये भाडमे ही बिनधास्त ,बेफिकीर वृत्ती वाढली आहे.माणसे क्वचित हिंसक,राक्षसी व्हायला लागली आहेत.माणसापेक्षा जनावरे बरी असे म्हणण्याची वेळ आली आहे. लग्न म्हणजे तडजोड आलीच.दोन्ही पक्षी थोडा बहुत त्याग आलाच.कुणी तरी माघार घेणे आलेच.इथे मीच का तो किंवा ती का नाही हा अट्टहास दिसतो.अगदी शिकली सवरलेली माणसे खालच्या पातळीवर जाऊन भांडतात.तेही लहान मुलांसमोर! कसचा आदर्श,कसचे एक्झांपल?शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतोच असे नाही हे सिध्द करण्याची जणू चढाओढ लागली आहे.अगदी प्रेम विवाह केलेली जोडपी देखील कधी लवकर,कधी उशीरा विभक्त होताना दिसतात..तेही पोटच्या छोट्या मुलांचा,मागचा पुढचा विचार न करता!मग जे केले ते खरेच प्रेम होते का? प्रेम म्हणजे त्याग,समजून घेणे, आवश्यक असल्यास माघार घेणे,दोन्ही पक्षी एक पाऊल मागे घेणे,तडजोड करणे..हे शहाणपण नसले तर ते कसले प्रेम? अन् लग्नाचे संस्कार,त्या आणा भाका, ती सात वचने, त्याचे काय? एकीकडे वटसावित्री उपवास,अन् दुसरीकडे नाते तोडण्याची भाषा..कपाळावरची टिकली टिकत नसेल तर लग्न कसे टिकणार? दोष कुणा एकाचा नसतोच.दोघांचा ही असतो. घरच्या वडील मंडळीचा, वृद्ध झालेल्या परावलंबी पालकाच्या जबाबदारीचा देखील प्रश्न आहेच.पूर्वीची एकत्र कुटुंब पद्धती केव्हाच लयाला गेली.मी, माझे ही संकुचित, कुपमंडूक वृत्ती वाढली.मग या वृद्ध पालकांनी कुठे जायचे.यांनीच पदराला खार लावून मुलांना शिकवले.आपल्या इच्छा आकांक्षा बाजूला ठेवून मुलीची लग्ने केली. आता पंख लाभता च ही पिढी साता समुद्रापार निघून गेली. त्यांना तिथल्या चंगळवादी जीवनाची सवय लागली.आई वडिलांची गरज बेबी सिटिंग पुरती उरली! सत्तर ऐंशी वय झालेले अनेक पालक इकडे भारतात एकाकी पडले आहेत. आलिया भोगासी सादर असे कंटाळवाणे, त्रासदायक जीवन जगताहेत.मुलांना कसा दोष द्यायचा? त्यांची नोकरी,त्याचे भविष्य,तिकडे निगडित आहे.त्यांचाही नाईलाज आहे.कुटुंब नवरा बायको पुरते,त्यांच्या मतभेदापूर्ते विस्कळीत झाले असे नाही.पालकांना देखील घटस्फोट मिळाला आहे.कोर्ट कचेरी न करता! आता लग्नाला पर्याय शोधला गेलाय.त्याला लाईव्ह इन असे गोंडस पाश्चात्य नाव आहे.इथे लग्नाचे बंधन नाही. सात फेऱ्याच्या आणा भाका नाहीत.कसली कमिटमेंट नाही.मर्जी आहे तोपर्यंत एकत्र राहा.नाही पटले अलग व्हा. मुले होऊ द्यायची की नाही हे तुमचे तुम्ही ठरवा.अलग झालात तर या अनौरस मुलाचा कायदेशीर प्रश्न आहेच.तोही तुमचा तुम्ही ठरवा.दोघानाही मन मानेल तसे वागायचे स्वातंत्र्य. पालकांना,नातेवाईकाना काय,कसे सांगायचे हेही तुमचे तुम्हीच ठरवा.३६० डीग्री फ्रीडम दोघानाही!.हे प्रस्थ आपल्याकडे वाढत चालले आहे.शहरी भागात अनेक जोडपी अशी एकत्र राहतात.समाजालाही त्याचे काही वाटेनासे झाले आहे.जोपर्यंत तुमचा कुणाला त्रास नाही,तुम्ही कुणाच्या अध्यात मध्यात नाही तोपर्यंत कुणाला हरकत घेण्याचे कारण नाही.सोसायटीत अशा जोडप्यांना कुणी नवे ठेवत नाही.अशा घटना समाज सहज स्विकारतो आहे. पुरुष स्त्रीच एकत्र राहतात असे नाही.दोन स्त्रिया ,दोन पुरुष देखील एकत्र राहू शकतात. प्रा नोव्हेल हरारी सारखा प्रसिध्द विचारवंत, बेस्ट सेलर लेखक जाहीर मुलाखतीत माझा नवरा अन् मी असा उल्लेख करतो..आपल्या कडेही अनेक कलावंत लिव्ह इन् ची जाहीर कबुली देताना दिसतात.आपण हे मान्य करायला लागलो.ते सुखी आहेत, त्याचा कुणाला त्रास नाही एव्हढेच स्वीकारा साठी पुरेसे आहे.लिव्ह इन ही दोघापुरती दोघांसाठी स्वखुशीने स्वीकारलेला पर्याय आहे.आमचा आनंद, आमचे सुख ठरविणारे तुम्ही कोण ही तात्विक बंडखोरी त्यामागे आहे.लग्नातली गुंतवणूक,बंधन( लग्नाची बेडी),हे देवा ब्राम्हणाच्या साक्षीने ,सामाजिक चौकटीत बंदिस्त संस्कार आहे. त्यातही एक वाक्यता नाही.कारण प्रत्येक जाती,धर्मात,राज्य प्रदेशात हे संस्कार,या चालीरीती भिन्न आहेत.लग्नाच्या गाठी देव स्वर्गातच बांधून पाठवतो वगैरे भाकड कथामुळे या लग्न संस्थेचे गांभीर्य पांचट झाले आहे.उलट लिव्ह इन् साठी वय,जात,धर्म,संस्कार,लेखाजोखा असे काहीही नाही.दोन व्यक्तींची एकत्र येऊन आनंदात राहण्याची प्रबळ इच्छा हेच पुरेसे आहे.लिव्ह इन मधील परस्परांविषयी चा आदर,एकच पातळीवर चा सन्मान लग्न संस्थेत क्वचितच आढळतो.तिथे पुरुषी वर्चस्व आहे.आर्थिक भेदभाव आहे.शैक्षणिक ,आर्थिक कमाई ची तुलना आहे.म्हणून तू तू मैं मैं आहे.घरचे काम तुझे,माझे काम बाहेरचे,अशी विभागणी आहे.अर्थात लिव्ह इन् मधील कायद्याची गुंतागुंत,मालमत्ते संबंधी वाद, मुले झाली तर त्याचे पुढे काय हे प्रश्न आहेतच.ते जर तितक्याच समजूत दारीने,दोघांना मान्य पद्धतीने सोडवले गेले,सामाजिक स्तरावर,कायद्याच्या चौकटीत मान्य झाले तर सोनेपे सुहागा! कुठलाही क्रांतिकारक नवा विचार हा समस्या,आव्हाने घेऊनच येतो बरोबर. तशी लग्न,कुटुंब संस्थेत काय कमी समस्या आहेत? पण तिथे सारे दडपण म्हणून,भीती पोटी,जबरदस्तीने स्वीकारावे लागते.त्यात आनंद,समाधान याचा प्रचंड अभाव असतो. शेवटी चांगलं आयुष्य कशाला म्हणायचं हे आपण ठरवायचं की आपल्या साठी इतरांनी ठरवायचं हा खरा प्रश्न आहे.काळा नुसार गरजा बदलल्या.तशाच सुख, आनंद यांच्या व्याख्या देखील बदलल्या. आपल्या लग्न संस्थेत सामाजिक दडपणां पोटी,कौटुंबिक दबावामुळे जोर जबरदस्तीने टिकवलेले स्थैर्य असेल पण समाधान किती हा प्रश्न आहे! ती झाकली मूठ आहे सव्वा लाखाची! लग्न संस्थेत नैतिकता आहे,चारित्र्य आहे असे म्हंटले जाते.पण आजच्या काळात त्यात तथ्य किती हेही तपासावे लागते. बऱ्याच गोष्टी लाजे खातर बाहेर येत नाहीत.सार्वजनिक होत नाहीत. म्हणून सारे काही ऑल वेल आहे असेही म्हणता येणार नाही.आता तर सोशल मीडिया मूळे अनेक धक्का दायक गोष्टी ऐकायला,बघायला मिळतात.सर्वच क्षेत्रात नैतिकतेची पातळी घसरत चालली आहे.

नात्यातील स्वास्थ्य हे आपल्या निवडीवर,आपल्या कृतीवर,निर्णयावर अवलंबून असते.बाहेरील फोर्स कार्यरत असतात.पण शेवटी आपणच जबाबदार असतो नाते संबंध दृढ करण्यासाठी किंवा तोडमोड करण्यासाठी. सहचार्यात आपल्या कर्तव्याची,जबाबदारीची सातत्याने जाणीव दोन्ही पक्षी जागृत ठेवली तर लग्न काय,कुटुंब काय, लिव्ह इन् रिलेशन काय सारे नीट टिकवता येते.गुंतागुंती ला घाबरण्या ऐवजी ते आव्हान म्हणून स्वीकारले तर आयुष्य सुसह्य होते.एकमेकांचा कंटाळा येऊ न देण्यासाठी देखील ही आव्हाने समोर असणे गरजेचे आहे.त्यातून सृजनशीलता वाढते.आपल्या हातून नवे,चांगले घडत जाते.मतभेद,भांडण्या साठी वेळच मिळत नाही! आता तर लग्ना आधी एक दोन वर्ष असेच एकत्र राहून बघू या ,असेही प्रयोग सुरू आहेत.जर पटले नाही तर त्या मुलीशी कुणी लग्न करेल का? हा संकुचित, बुरसटलेला विचार मागे पडला आहे.नैतिकता,चारित्र्य नेमके कशाला म्हणायचे याचा पुनर्विचार होतो आहे.कारण पडद्याआड ची खोटी नाटकी नैतिकता आपण समाजात बघितली आहे.बघतो आहोत.. शेवटी परस्परांवर असलेला विश्वास महत्वाचा.आनंद देणे घेणे महत्त्वाचे.सुज्ञ शहाणे होणे महत्त्वाचे.त्यासाठी दोघांनीही सक्षम होणे गरजेचे.नाते हा एक पेशंट समजा.तुम्ही दोघे त्या पेशंट ला वाचविणारे सर्जन. एकत्र जोडीदार म्हणून जगण्यातला आनंद ही एकाची गरज नाही.दोघांचीही गरज आहे एव्हढे लक्षात ठेवले तर लग्न काय,कुटुंब काय, लिव्ह इन् काय सारे सारखेच.. सगळे टिकेल..उगाच काळजी करण्याची गरज नाही.काळजी घेण्याची मात्र गरज आहे!

# विवाह हा सामाजिक संस्कार

आधुनिक केसरी



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

**साध्य घटस्फोटाचे प्रमाण झपाट्याने वाढीस लागले आहे.विवाहा हा संस्कार आहे याची जाणीव राहिली नसल्याने शुल्लक कारणावरून टोकाची भूमिका घेतली जाते.हे हितार्थ नाही शुभ विवाह हा शुभ संसार ठरला पाहिजे विवाह हा सामाजिक संस्कार आहे आणि संस्कार हा पालन करण्यासाठी असतो .मग आपली इच्छा असो वा नसो पण संस्कारच पालन हे करावच लागत याची जाणीव हि उभ्यतांना होण गरजेच आहे. आप आपली जबाबदारी भुमिका आणि कर्तव्य हे व्यक्तिगत प्रत्येकाला समजलं पाहिजे.हे नाही समजल तर मग अनेक अडचणी उद्भवतात. सामाजिक व्यवस्था आणि परंपरा यावर त्या ,त्या युगातील विविध घटकांचा परिणाम हा होत असतो.**

युग जितकं संस्कारक्षम असतं तितकेच नाते हे संबंध मजबूत असतात.आणि जसा जसा संस्कारांचा प्रभाव कमी होतो तसं तसं नातेसंबंध हे कमकुवत आणि दुबळे होत जातात.तस पाहिलं तर त्या त्या युगाचा  प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रभाव हा सामाजिक जीवनावर होत असतोच.सध्याच सामाजिक जीवन हे आर्थिकदृष्ट्या प्रगतशील असलं आणि  तंत्रज्ञान युगाच्या दिशेने जरी आपण आज वेगवान वाटचाल करत असलो.तरी देखील  सामाजिक पातळीवर विद्यमान स्थितीत नाते संबंध हे खुप झपाट्याने बिघडत चालले आहेत.हे वास्तव कोणीही सहजासहजी नाकारू शकत नाही.आणि याचे थेट वैवाहिक जीवनावर प्रतिकुल परिणाम होत आहेत.पण या साठी काही तरी गंभीर कारण असली पाहिजेत पण वास्तव पाहिलं तर कोणतही गंभीर कारण नसताना फक्त अंहकार बळावला कि तो नात्यांचा बळी घेऊनच स्थिरावतो.पण हाच किरकोळ आणि मुख्य कारण असणारा अंहकार आपला शत्रु असला तरी देखील आपलं खोटं खोटं समाधान होण्यासाठी आपलीच बाजु सत्याची आहे. आपणच खरे आहोत असं अंहकार आपल्याला ठामपणे बजावतो . अणि आपण तेच सत्य मानतो आणि आपला शत्रु असणारा अंहकार आपण त्याला आपला सगळ्यात जवळचा हितेशी समजतो.आणि संपुर्ण जीवनाची वाट लागली तरी आपल्याला अंहकार मागे फिरू देत नाही.आणि आपली पुरती वाट लागल्यानंतर अंहाकार निघून जातो.पण तोपर्यंत सगळं आभाळ फाटलेले असतं . शिल्लक काही राहत नाही . आणि म्हणून अंहकाराच हा संस्कारात शुन्य असतो.अंहकार शुन्य असेल तरच आपण आपल्या जीवनात असणारे आपले नातेसंबंध हे टिकवु शकतो.आणि म्हणून प्रत्येकाने सध्याच्या युगात नातेसंबंध व्यवस्थित टिकविण्यासाठी अंहकाराच सिमावलोघंन केलच पाहिजे.आणि आपल्या जीवनात अंहकार असंच आपलं रूप विस्तार करत राहिला तर मग मात्र आपलं जीवन प्रभावित झाल्याशिवाय राहणार नाही. नाते कौटुंबिक असो कि वैवाहिक जीवनातील असो त्याचं एक अनन्य साधारण असं महत्व असत.पण हे महत्व सध्या कमी झालं आहे हे वास्तव आहे आणि वैवाहिक जीवनातील घटस्फोटांच प्रमाण चिंताजनक झाल आहे. दिवसेंदिवस हे प्रमाण अधिक वाढत रहिल तर घटस्फोट हि एक सामाजिक जीवनातील गंभीर समस्या म्हणून उदयाला येईल. साधारणतः नात्याचे दोन प्रकार असतात एक महणजे शाश्वत नाते संबंध आणि दुसरे म्हणजे भौतिक नाते संबंध शाश्वत नाते संबंध हे कोणत्याही प्रकारचा मोह,माया स्वार्थ या पालिकडे असतात आणि अशी नाती जीवनात खुप कमी नगण्य असतात.तर भौतिक नाते संबंध हे मोह,माय,स्वार्थ,या पायावर उभी असतात आणि म्हणून त्याचं भविष्य अंधकारमय असतं.आणि भौतिक जीवनात अहंकार हा प्रचंड असल्याने ,मी मोठा कि तु मोठा ,मी हुशार,कि तु हुशार,मी चांगला कि तु चांगला,म्हणजे अगदी किरकोळ किरकोळ विषयावर वैचारिक मतभेद निर्माण होतात आणि या मतभेदाचे अंहकार मन भेदात रूपांतर करतो.मग आशा या भौतिक परिस्थिती मध्ये कोणीही एक पाऊल मागे येत नाही आणि जर कोणी येण्याचा प्रयत्न केला तर अंहकार मागे येवु देत नाही.आणि मग सरतेशेवटी याची परिणती नातेसंबंध संपुष्टात येण्या मध्ये होते.आणि मग शेवटच्या क्षणा पर्यंत अंहकार कोणालाही माघार घेऊ देत नसल्याने नातेसंबंध संपुष्टात येतात.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore *   Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar  414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# प्राचीन इतिहास अभ्यासण्यासाठी मोडी लिपी शिकणे गरजेचे : अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली

## कार्यशाळेत एकूण 92 विद्यार्थ्यांनी नोंदविला सहभाग


आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** भारतीय संस्कृती ही फार प्राचीन संस्कृती आहे. पुरातन मंदिरे, शिल्प, शिलालेख तसेच ऐतिहासिक स्थळी आजही मोडी भाषा लिहिलेली आढळून येते. मोडी लिपीतून इतिहासाची अनेक भाषिक साधने आपल्याला अभ्यासता येणे शक्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक जीवनात प्राचीन साहित्य व साधनांचा अभ्यास करण्यासाठी मोडी लिपी शिकून त्याचा वापर करणे गरजेचे आहे. असे मानव व विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एस. चंद्रमौली यांनी सांगितले. पदव्युत्तर शैक्षणिक इतिहास विभाग, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली व पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. कार्यशाळेला, पुराभिलेख संचालनालय मुंबईचे अभिलेखाधिकारी मनोज राजपूत, नागपूरचे अभिलेखाधिकारी के.डी. खंदारे, मोडी लिपी तज्ञ मनोज महल्ले, पंकज पाटील, पदव्युत्तर इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर मने, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. नरेश मडावी, इतिहास विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. संतोष सुरडकर, डॉ. प्रफुल्ल नांदे आदी उपस्थित होते. 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत एकूण 92 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. अधिष्ठाता डॉ. चंद्रमौली म्हणाले, जीवनात विद्यार्थ्यांना मोडी लिपीचे महत्त्व समजून घेता यावे याकरीता या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पदव्युत्तर शैक्षणिक इतिहास विभागाने 'मोडी लिपी प्रचार व प्रसार' हा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. याकरीता कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी हिरवी झेंडी दिली असून विद्यार्थ्यांना मोडी लिपी शिकता यावी याकरीता संधी उपलब्ध करून दिली आहे, तसेच मोडी लिपीला पुनर्जीवित करून ऐतिहासिक संशोधनासाठी त्याचा वापर व्हावा हा या कार्यशाळेमागचा उद्देश असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविकेत बोलतांना पदव्युत्तर शैक्षणिक इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर मने म्हणाले, राज्यकारभार करतांना मराठ्यांनी पर्शियन, मोडी अशा लिपीच्या वापरातून आदेश किंवा अंमलबजावणी संबंधीची कागदपत्रे स्थानिक राजवटींशी झालेले तह, करार, देण्याघेण्यासंबंधीच्या नोंदीचे लेखन मोडी लिपीतून केलेले पहावयास मिळते. तसेच वाडवडीलोपार्जित संपत्तीच्या नोंदी, अनेक सांस्कृतिक, ऐतिहासिक तसेच सामाजिक विषयावरील लेखन मोडी लिपीमध्ये करण्यात आले आहे. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या मोडी कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. मोडी लिपीचे स्वरूप, त्याचा काळ गेलेला असला तरी महसूल विभागातील जुन्या कागदपत्रांचा अभ्यास करण्यासाठी मोडी लिपी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे ते म्हणाले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेला विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती. कार्यशाळेचे संचालन इतिहास विभागाचा विद्यार्थी रमाकांत चव्हाण यांनी तर आभार कार्यशाळेचे समन्वयक डॉ.नरेश मडावी यांनी मानले.

# सेंसर बोर्ड सल्लागार समिती सदस्यपदी डॉ. लाल तनवाणी

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :**उल्हासनगर शहरातील कॉमर्स क्लासेस व



पद्मा कोचिंग क्लासेसचे सीएमडी, नवजीवन बैंक चे डायरेक्टर आणि बीबीआरटी इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक सदस्य डॉ. लाल तनवाणी यांची केंद्र सरकारच्या सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनच्या सल्लागार पॅनेलचे सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
डॉ.लाल तनवाणी यांच्या नावावर यापूर्वीच अनेक विक्रम नोंदवले गेले असून त्यात सलग तीन वर्षात तीन विषयात पीएचडी पूर्ण केल्याच्या आंतरराष्ट्रीय बुक्स ऑफ रेकॉर्डमध्ये नाव नोंदवण्याचा विक्रमही आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन किंवा बोर्ड ऑफ सेन्सॉर ऑफ इंडिया ही भारतातील चित्रपट, टीव्ही मालिका, टीव्ही जाहिराती आणि विविध दृश्य सामग्रीचे पुनरावलोकन करण्यासाठी जबाबदार नियामक संस्था आहे. हे भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत आहे. सदर संस्थेच्या अध्यक्षपदी विद्या बालन आहेत.

# कामगाराचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** गोदावरी नदीपात्रात गंगापूर धरणातून आवर्तन सोडण्यात आल्यावर रात्री नदीपात्रात झोपलेल्या एकाचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येते. जलालपूर परिसरातील नदीपात्रात असलेल्या बाणेश्वर मंदिराजवळ त्याचा मृतदेह आढळून आला. अंकुश ददरे (३०) आणि त्याचा मित्र दीपक पवार (२७, दोघेही राहणार ओढत बाजार) हे दोघे महादेवपूर ग्रामपंचायतीच्या विहिरीचे खोदकाम करत होते. खोदकाम करत असताना रात्री उशीर झाल्याने दोघेही गोदावरी नदीपात्रातच झोपून गेले.

# जिंतूरात रोगनिदान, आरोग्य तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** येथे अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर सद्गुरु प. पु मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटल अँड मेडिकल ट्रस्ट अंतर्गत सर्व रोगनिदान व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा प्रतिनिधी सचिन गोरे व गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथून डॉ. मोहन गैारकर, डॉ.नानासाहेब शेवाळे जिंतूर केंद्रामार्फत आयुर्वेद व पंचकर्म तज्ञ वैद्य शिवप्रसाद सानप, केशव उन्हाळे प्रसिद्धी प्रमुख सचिन रायपत्रिवार , बाळासाहेब रामपुरकर सौ. अर्चनाताई आघाव इ . उपस्थित होते. हे शिबिर सकाळी १० वाजल्यापासून ते दु ५ वा. पर्यंत सुरू होते या शिबीरात नाड़ी परीक्षेद्वारे डॉ मोहन गैारकर, डॉ.



नानासाहेब शेवाळे व वैद्य शिवप्रसाद सानप यांनी रुग्णांची तपासणी करून औषधोपचार केले. यामध्ये सांधेदुखी, पाठदुखी, कंबर दुखी, मणक्याचे विकार, आम्लपित्ताचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब या व्याधींचे जास्त रुग्ण आढळून आले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी नियमित कार्यरत सेवेकरी आश्रुबा देवकर मामा, उद्धव देशमुख, अनिकेत आहेर, केंद्रप्रमुख विश्वनाथ वाघ, अंबादास देशमुख, विनायकराव घुगे, रमेश देवकर, संजय इटोलीकर , कीर्तनेश्वर काळे व सर्व सेवेकरी यांनी अथक परिश्रम घेतले.

# भिडे गुरूजी यांना सुरक्षा देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** हिंदू धर्म विचार प्रसारचे विचार माड़णारे भिड़े गुरूजी यांच्यावर झालेल्या भैड हल्ला प्रकरणी भिड़े यांना क़यामस्वरूपी सुरक्षा द्यावी, अशी मागणी करुन शनिशिंगनापुर पोलिस ठाणे यांना श्री शिवप्रतिष्ठान हिन्दुस्थान व सोनई, शनिशिंगनापुर सकल हिंदू सामाजच्या वतीने निवेदन दिले आहे. श्री शिवप्रतिष्ठान हिन्दुस्थान सघटनेचे संस्थापक गुरुवर्य श्री संभाजीराव विनायकराव भिड़े (गुरूजी) हे नाशिक जिल्ह्यातील मनमाड येथे कार्यक्रम आटपुन धुळेकड़े जात असताना काही समाज कंटकानी जमाव गोळा करुन, गाड़ी अडवीण्याचा प्रयत्न व शिJविगाळ आर्वच्या भाषेत घोषणा दिल्याने याचा निषेध म्हणून श्री शिवप्रतिष्ठान हिंदू सघटना व शनिशिंगनापुर, सोनई, सकल हिंदू समाजाचे वतीने पोलिस थाण्याला निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, राज्यात ठीकठिकाणी कार्यक्रम होत आहे,अश्या परिस्थितित कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सरकारने राज्यात व राज्यबाहेर क़ायमस्वरूपी सुरक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



# वनांची सेवा आणि पर्यावरणाचे संरक्षण हे ईश्वरीय कार्य : वनमंत्री सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'जंगल से जीवन के मंगल तक' आणि 'वन से



धन तक' या संकल्पनेवरच वन विभाग काम करीत आहे. वनांची सेवा आणि पर्यावरणाचे संरक्षण हे ईश्वरीय कार्य आहे. त्यामुळे या भवनातून वन संवर्धन आणि वनांची सुरक्षेचे काम होईल, असा विश्वास राज्याचे वनमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.
नवीन वनभवन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी वन विभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबलप्रमुख शैलेश टेंभुर्णीकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक) शोमिता विश्वास, महिम गुप्ता (वन्यजीव), ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, उपवनरंक्षक कुशाग्र पाठक, जितेश मल्होत्रा, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता अरुण गाडेगोणे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, विभागीय वनअधिकारी प्रशांत खाडे आदी उपस्थित होते.
चंद्रपूर – नागपूर रस्त्यावर जवळपास 8153 चौ. मी. वर नवीन वनभवन उभे राहत आहे, असे सांगून वनमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, येथे कार्यरत असलेले सात विविध कार्यालये एकाच छताखाली आता येणार आहे. वन संवर्धन आणि वनांची सुरक्षा या भवनातून होईल. राज्यात सर्वात जास्त वनक्षेत्र असलेले चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे प्रगतीच्या विविध क्षेत्रात अधोरेखांकित झाले आहेत. आपल्या राज्याचा वनविभाग हा उत्तम व्हावा, यासाठी आपण सर्वजण संकल्प करू या, असे आवाहन त्यांनी केले.
वनविभागाचा सुवर्णकाळ : सध्या वनविभागाचा सुवर्णकाळ सुरू आहे. इतर विभागांनी हेवा करावा, असे काम वनविभागात होत आहे. यासाठी वरिष्ठ अधिका-यांसह गावस्तरावर काम करणारे अधिकारी आणि कर्मचा-यांचे चांगले सहकार्य मिळत आहे. वनविभागाचे प्रधान सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी हे अतिशय बुध्दीमान आणि संयमी अधिकारी आहेत. तर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबलप्रमुख शैलेश टेंभुर्णीकर आणि महिप गुप्ता हे कल्पक अधिकारी आहेत, असे गौरवोद्गार वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काढले.
असे राहील नवीन वनभवन : चंद्रपूर – नागपूर रस्त्यावर सिव्हील लाईन येथे 60 कोटी 92 लक्ष रुपये खर्च करून नवीन वनभवन साकारण्यात येणार आहे. यात तळमजल्यावर (2229.74 चौ.मी.) मुख्य वनसंरक्षक कार्यालय, पहिल्या माळ्यावर (1507.82 चौ.मी.) उपवनसंरक्षक, मध्यचांदा विभाग कार्यालय, दुस-या माळ्यावर (1497.05 चौ.मी.) विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग कार्यालय, तिस-या माळ्यावर (1497.05 चौ.मी.) विभागीय वन अधिकारी, चवथ्या माळ्यावर (1421.63 चौ.मी.) विभागीय वन अधिकारी, मुल्यमापन विभाग आणि संशोधन विभाग राहणार आहे. याशिवाय वाहनचालक आणि सुरक्षा रक्षक कक्ष, संरक्षण भिंतीचे बांधकाम, सिमेंट काँक्रिट अंतर्गत रस्ते बांधकाम, सिमेंट नाली बांधकाम, वाहनतळ, वाहनशेड, पेव्हींग ब्लॉक, फर्निचर, रेनवॉटर हार्वेस्टिंग, जलपुनर्भरण व पाणी साठवण टाकी, बागबगीचा व लॅन्डस्केप, म्युलर, पेंटींग व स्क्लप्चर, पाणी पुरवठा व मलनिःसारण आदी कामे करण्यात येणार आहे.

# ट्रकने अपघातग्रस्तांना चिरडले; तीन जणांचा अंत

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन अपघात घडला. त्याच वेळी मागून येणाऱ्या ट्रकने अपघातग्रस्तांना चिरडल्यामुळे तीन जणांचा मृत्यू, तर तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी रात्री बाळापूर-पातूर मार्गावर वाडेगावजवळ घडली. बाळापूरकडे जात असलेली दुचाकी व विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीची जोरदार धडक झाली. या दोन्ही दुचाकीवर प्रत्येकी तीन जण स्वार होते. अपघात झाल्यानंतर दुचाकीस्वार रस्त्यावर पडले. नेमके त्याचवेळी दुचाकीच्या पाठीमागून येणाऱ्या भरधाव ट्रकने त्यांना चिरडले. या विचित्र अपघातात तिघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला व तिघे गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये अब्दुल सादिक अब्दुल रज्जाक (वय ४३), अब्दुल मजीद अब्दुल सादिक (२९), अब्दुल शोएब अब्दुल खालिद (१४) यांचा समावेश आहे. जखमींमध्ये खिरपुरी येथील सक्षम शिरसाट, प्रणव शिरसाट व पवार नावाचा युवक आहे. ते दिग्रस येथे कार्यक्रमाला जात होते. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तत्काळ अकोल्यातील सर्वोपचार रुग्णालय आणण्यात आले. वाहतूक विस्कळीत होऊन वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

# तानाजी मालुसरे समाधीस्थळ सुशोभीकरणासाठी 10 कोटींचा निधी

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा, पराक्रमाचा वारसा असलेल्या गडकिल्ल्यांचे संवर्धन राज्य शासनामार्फत केले जात आहे. तसेच स्वराज्य निर्मितीसाठी प्राणपणाने लढलेल्या मावळ्यांच्या कार्यातून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळावी, म्हणून ऐतिहासिक स्थळांचा, गावांचा विकास केला जात आहे. या अंतर्गत उमरठ येथील नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ सुशोभिकरण आणि परिसराचा विकास करण्यासाठी 10 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केले.

तसेच या परिसराचा विकास करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. पोलादपूर तालुक्यातील उमरठ येथे नरवीर तानाजी मालुसरे यांच्या 354 व्या पुण्यतिथीनिमित्त नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ व परिसर सुशोभिकरण कामाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, (ऑनलाईन), उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत, खासदार सुनिल तटकरे, आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी किशन जावळे, ज्येष्ठ इतिहासकार आप्पासाहेब परब, स्थानिक समिती अध्यक्ष चंद्रकांत कळंबे यांसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या समाधीस्थळाचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुशोभिकरण होणार असून यामध्ये शिवकालीन जननी कुंभळाजाई मंदिराचे सुशोभिकरण, समाधी प्रवेशद्वाराजवळच्या कमानीचे बांधकाम, बुरुजाचे बांधकाम, प्रसाधनगृहे, अंतर्गत रस्ते कॉंक्रीट गटार, कंपाउंड वॉलचे बांधकाम ही कामे करण्यात येणार आहेत.

उमरठच्या ऐतिहासिक भूमीत नरवीर तानाजी मालुसरे आणि त्यांच्या समवेत कोंढाणा किल्ल्यावरील पराक्रमात लढलेल्या शेलार मामा यांची समाधी आहे. या दोन्ही शूरवीरांना अभिवादन करुन मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी



महाराजांना तानाजी मालुसरे यांनी दिलेली साथ आणि 'आधी लगीन कोंढाण्याचं मग रायबाचं'..ही घोषणा इतिहासात अजरामर झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना नरवीर तानाजी मालुसरे यांनी दिलेली साथ आणि स्वामी निष्ठेचा जगापुढे ठेवलेला आदर्श हा इतिहास कधीही विसरू शकणार नाही. राज्य शासनामार्फत छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेल्या गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्यात येत आहे. यामध्ये पहिल्या टप्प्यात राज्यातील 32 शिवकालीन गड-किल्ल्यांचे संवर्धन करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच रायगडाच्या पायथ्याशी पाचाड येथे उभारण्यात येणाऱ्या शिवसृष्टीसाठी 50 कोटी देखील मंजूर केले आहेत. या सर्व कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्य शासनामार्फत आग्र्याला देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येत आहे. याबरोबरच स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे तुळापूर येथील बलिदान स्थळ आणि शिरूरच्या वढू येथील समाधीस्थळाचं भव्य स्मारक उभारण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यातील पोलादपुर तालुका दुर्गम आणि डोंगराळ आहे. या भागातील युवकांचे रोजगारासाठीच्या स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे. हे लक्षात घेवून या भागातील पर्यटन विकासाला चालना देवून स्थानिक ठिकाणी रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. पालकमंत्री उदय सामंत म्हणाले की, शिवकालीन इतिहास पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य शासनाने हे ऐतिहासिक पाऊल उचलेले आहे. नरवीर तानाजी मालुसरे यांचे समाधीस्थळ आणि परिसराचे सुशोभिकरण करताना त्यांच्या वाड्याचे देखील या निधीमधनू सुशोभिकरण करण्यात येईल असे जाहीर केले. तसेच या परिसरातील जिल्हा परिषदेच्या विश्रामगृहाचे देखील जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीमधून प्राधान्याने नूतनीकरण करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना यावेळी दिल्या. यावेळी खासदार सुनिल तटकरे यांनी या भागाच्या विकासासाठी राज्य शासनामार्फत प्रभावी उपाययोजना करण्यात येत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार भरत गोगावले यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पालकमंत्री उदय सामंत आणि उपस्थित मान्यवरांनी नरवीर तानाजी मालुसरे आणि शेलारमामा यांच्या समाधीस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच यावेळी ज्येष्ठ इतिहासकार आप्पासाहेब परब यांना शौर्य पुरस्काराचे वितरण करण्यात आले.

# सारा अंधार फाउंडेशनने फुलविले १०१ आदिवासी, गरीब नवदाम्पत्यांचे संसार

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश कांबळे**

**अंबरनाथ :** शहरातील आदिवासी व गरीब कुटुंबातील १०१ नवदाम्पत्यांचे संसार फुलवण्याचे पुण्यकर्म सारा आधार फाउंडेशन या शहरातील सामाजिक संघटनेने पार पाडले आहे. सारा अंधार फाउंडेशन या सामाजिक संघटनेने मागील काही वर्षांपासून सातत्याने अशा सामुदायिक विवाह सोहळा आयोजनाचे सामाजिक दायित्व निभावत आहे.

चिखलोली येथील ठाकुर पाडा येथे संपन्न झालेल्या या भव्य सामुदायिक विवाह सोहळ्यात या संस्थेने १०१ मुलींचे कन्यादान केले. सारा आधार फाउंडेशनचे सर्वेसर्वा किशोर सोरखादे यांनी या विधायक उपक्रमाचं नेतृत्व व आयोजन केलं होतं. आदिवासी बांधवांना मदतीचा हात मिळावा या उद्देशाने सोरखादे यांनी या विवाह सोहळ्यात सामील सर्व वऱ्हाडी मंडळीचे स्वागत व भोजन व्यवस्था मंडपातच केली होती. सारा आधार फाउंडेशनचे कार्यकर्ते व स्थानिक



ग्रामस्थांनी याकामी चोख व्यवस्था केली होती.यावेळी फाउंडेशनच्या वतीने समाजात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते व राजकारणी यांनाही गौरविण्यात आले. यात अंबरनाथच्या माजी नगराध्यक्षा मनिषा वाळेकर यांना 'लोकनायिका' या सन्मानाने गौरविण्यात आले. आपल्या या सन्मानास उत्तर देतांना हा पुरस्कार त्यांनी आपल्या शिवसैनिकांना अर्पण केला.

या भव्य सामुदायिक विवाह सोहळ्यास प्रामुख्याने कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शहरप्रमुख अरविंद वाळेकर, कॉंग्रेस शहराध्यक्ष प्रदीप पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सचिन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



# लोह्यात मनोज पाटील जरांगे यांनी साधला कार्यकर्त्यांशी संवाद

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सध्या राज्यात मराठा आरक्षण मुद्दा पेटला असून राज्य सरकारने मराठा समाजाला दिलेले दहा टक्के स्वतंत्र आरक्षण हे स्वतंत्र न देता ते ओबीसी प्रवर्गातून द्यावे, सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी, अंतरवली सराटी सह राज्यात मराठा बांधवांवर दाखल केलेले गुन्हे तत्काळ मागे घ्यावे या प्रमुख मागण्या राज्य सरकारने पूर्ण करावयात अशी मागणी मनोज पाटील जरांगे यांनी उपस्थित मराठा बंधवांशी संवाद साधताना केली.

राज्यभरात पुन्हा एकदा मराठा समजला एकवटण्यासाठी जरांगे यांनी राज्यात दौरा सुरू केला असून त्या अंतर्गत ते दि. ४ मार्च रोजी सोमवारी रात्री नऊ वाजताच्या दरम्यान जरांगे पाटील सोलापूर हून नांदेड कडे जात असताना लोहा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कांहीं वेळ मराठा समाज बांधवाशी संवाद साधला. प्रारंभी त्यांनी शिवरायांच्या पुतळ्यास अभिवादन करून उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी हजारो मराठा बांधवांची उपस्थिती होती.




# लिटल चॅम्पस शाळेत स्नेहसंमेलन रंगले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एमआयडीसी परीसरातील पिंपळवाडी फाटा येथील " लिटल चॅम्पस नॅशनल इंग्रजी शाळेत " नुकतेच स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रमात नर्सरी ते पाचवीच्या वर्गातील विद्यार्थी- विद्यार्थींनीनी सहभाग घेतला होता. सांस्कृतिक कार्यक्रमात नवीन- जुने हिंदी- मराठी गीतावर सहभागी विद्यार्थ्यानी बहारदार नृत्य आणि अभिनय सादर करून उपस्थित विद्यार्थी- पालकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी " लिटल चॅम्पस नॅशनल " इंग्रजी शाळेचे संस्थापक अध्यक्ष शेख युनुस मंजूरभाई यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुण्याचे व उपस्थित मान्यवरांचा गुलाबपुष्प देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पैठण पंचायत समितीचे सदस्य विशाल थोटे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर हे होते. तसेच व्यासपीठासमोर प्रमुख अतिथी म्हणून कलीम इनामदार, दादाराव गलांडे, रमेश शेळके इत्यादि मान्यवर उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमातील सहभागी विद्याथ्र्याना मान्यवरांच्या हस्ते मेडल व प्रमानपत्र सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यास शाळेच्या संचालिका श्रीमती समीरा युनुस शेख तसेच मुख्याध्यापिका वर्षा गिन्हे, तसेच शिक्षिका - दिपाली तुपकरी, बुशरा शेख, आरती चाबुकस्वार, शितल रोडी, अंकीता अवचर, पुनम गोरे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षिका बुशरा शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन दिपाली तुपकरी यांनी मानले. यावेळी कार्यक्रमास परीसरातील नागरीक, पालकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.



# ज्येष्ठ अध्यापिका श्रीमती वैभवी काळे यांचा सेवानिवृत्ती गौरव सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्रकुमार शेळके**

**पुणे :** जिल्हा शिक्षण मंडळाच्या पिरंगुट येथील अनंतराव पवार महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख व ज्येष्ठ अध्यापिका श्रीमती वैभवी राजन काळे या आपल्या 33 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळ व महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सेवापूर्ती गुण गौरव सोहळा नुकताच संपन्न झाला.संस्थेचे उप सचिव एल.एम.पवार यांच्या हस्ते त्यांना मानपत्र,सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ देवून गौरविण्यात आले.पुणे जिल्हा मंडळाचे विद्यमान अध्यक्ष व राज्याचे उप मुख्यमंत्री अजित पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, ऍड .संदीप कदम, ऍड.मोहनराव देशमुख, सह सचिव प्रशासन ए.एम. जाधव यांनी श्रीमती .वैभवी काळे यांचे अभिनंदन करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी व्यासपीठावर उपसचिव एल.एम.पवार,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .अभय खंडागळे,उप प्राचार्य डॉ. प्रविण चोळके,डॉ.शिवाजी शिंदे, मामासाहेब मोहोळ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शर्मिला चौधरी,आण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे,ज्येष्ठ साहित्यिक डॉ.आनंद महाजन,आदी मान्यवर उपस्थित होते.या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.श्रीकांत देशमुख,डॉ.गणेश चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन उप प्राचार्य डॉ.शिवाजी शिंदे यांनी केले.

# प्रामाणिकपणे कष्ट केल्यास यश निश्चित..!

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील भर जहागीर येथिल सैनिक अशोक सोगे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले.त्यांच्या मायभुतीतील आगमणा निमित्त ग्रामस्थांनी भव्य मिरवणूक काढली होती. मिरवणुक समाप्ती नंतर एका कार्यक्रमात सेवानिवृत्त सैनिक अशोक सोगे यांच्या कार्याला उजाळा देतांनी शिक्षण विस्तार अधिकारी सतीष काष्टे यांनी वरील गौरोउद्गार काढले. तालुक्यातील भर जहागीर येथे अशोक सोगे यांच्या सेवानिवृत्त निमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबुराव फुके होते. प्रमुख उपस्थितीत सैय्यद शकील,महादेव क्षीरसागर, सदाशिव डोंगरे, विशाल गरकल होते. तर प्रमुख मार्गदर्शक शिक्षण विस्तार अधिकारी सतीष काष्टे होते. काष्टे पुढे बोलतांनी त्यांनी सेवानिवृत्त अशोक सोगे यांच्या देशसेवेतील कार्याला उजाळा देतांनी 1988 पासुन सोगे यांनी जबलपुर येथुन देशसेवेत भरती झाल्या नंतर,गोवा,नागालॅंड,आसाम,नागपुर, जम्मु काश्मिर, उत्तरांचल,अंबाला,हरीयाना,जम्मु काश्मिर, दिल्ली, जम्मु काश्मिर आशा प्रकारे सुमारे 26 वर्षे देशसेवा केली. विशेष म्हणजे वडीलांचे छत्र लहापणीच नियतीने हिरावल्या नंतर कौटुंबिक परीस्थिती अतिशय हालाखीची आसतांनी अशोक सोगे यांनी कठोर मेहनत करीत आपल्या कुटुंबाच्या गाड्याला हाथभार लावला. 1988 मध्ये सैनिक भरती मारली आणि सोगे देशसेवेत दाखल झाल्याचे सांगीतले,त्यांच्या सेवेती सुमारे बारा वर्षाची सेवा ही अतीशय संवेदनशील भाग अर्थात जम्मु काश्मिर मध्ये सेवा दिली. सोगे यांचे मार्गदर्शन परीसरातील युवकांना सतत लाभदायक ठरले तर त्यांच्या अनुभवातुन युवकांनी उर्जा घेणे काळाची गरज आसल्याचे सांगीतले,मिरवणुकी दरम्यान गावातील प्रत्येक चौकामध्ये महिला पुरूषांनी मोठ्या उत्सहात स्वागत केले.फुलांच्या उधळणीसह,प्रत्येक रस्त्यावर आकर्षक रांगोळीने स्वागत केले,तर गावातील प्रत्येक मंदिर,मस्जिद,डॉ बाबासाहेब आंबेडकर,गौतम बुद्ध,माहात्मा फुले,अहिल्या देवी



होळकर,संताजी महाराज,जगदंबा माता,संत गजानन महाराज, भारद्वाज मंदिर,गणेश मंदीरातील देवदावतांना पुष्पहार अर्पण केले.तर गणेश मंदिरामध्ये सभा घेत कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी सिध्दीविनायक गणेश मंडळासह,गावातील सर्व जाती-धर्मातील युवक,युवतीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ. जोरगेवारांची युनियनच्या विविध मागण्यांसाठी सीएटीपीएसच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सिएसटीपीएस येथे कार्यरत विविध 17 संघटनांच्या विविध मागण्यांना घेऊन आमदार किशोर जोरगेवार यांनी सि एस टी पी एस च्या अधिका-यांची बैठक बोलावली होती. यावेळी विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. बंकर कुकींग 5,6 आणि 7 चा कंत्राटाचे नुतणीकरण करुन येथे कामगारांना पुर्वरत कामावर घेण्याच्या सुचना यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी केल्या आहे. त्यामूळे येत्या 20 दिवसात कामारुन बंद करण्यात आलेल्या सर्व कामगारांना काम मिळणार आहे.



17 युनियन सह पहिल्यांदास हिराई विश्रामगृहात झालेल्या या बैठकीला सिएटीपीएसचे मुख्य अभियंता गिरीश कुमरवार, उपमुख्य अभियंता डॉ. भुषण शिंदे, शाम राठोड, प्रफुल कुटेमाटे, फनिंद्र नाखले, वित्त व लेखा विभागाचे महाव्यवस्थापक बाहुबली दोडल, अधिक्षक अभियंता महेश राजूरकर, मिलींद रामटेके, समाज कल्याण अधिकारी दिलीप वंजारी, उप महाव्यवस्थापक हिना खय्याम, यंग चांदा ब्रिगेडच्या विज कामगार सेनेचे हरमन जोसेफ, युवा नेते अमोल शेंडे, आदिवासी विभागाचे जिल्हाध्यक्ष जितेश कुळमेथे, अल्पसंख्याक विभागाचे युथ शहर अध्यक्ष राशेद हुसेन, करणसिंह बैस, प्रसिद्धी प्रमुख नकूल वासमवार, ताहिर हुसेन, गौरव जोरगेवार, कार्तीक बोरेवार, राम मेंढे, यंग चांदा ब्रिगेडचे विज कामगार सेनेचे प्रकाश पडाल, करण नायर, नितिन कार्लेकर, शकील शेख, उमेश नागपूरे, अशोक ठाकरे आदींची उपस्थिती होती.

चंद्रपूरातील औष्णिक विद्युत केंद्र राज्याला विज पूरवतो. येथील कामगारांमूळे हे शक्य होत आहे. अशात येथील कामगारांच्या समस्यांकडे आपण प्राधाण्याने लक्ष दिले पाहिजे. कामगारांना सन्मानजनक वागणूक आपण दिली पाहिजे. त्यांना योग्य सोयी सुविधा व सुरक्षा साधने नियमित दिल्या गेली पाहिजे अशा सुचना या बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी संबधित अधिका-यांना केल्या आहे. कामगार बेरोजगार होणार नाही यासाठी जुना कंत्राट संपण्याच्या तिन महिने अगोदर नवीन कंत्राट प्रक्रिया सुरु करण्यात यावी, जोशी कमेटीच्या अहवाला नुसार वर्क ऑर्डर नुसार गेट पास देण्यात यावे, कंत्राटी कर्मचा-याची दर वर्षी पोलिस व्हेरिफीकेशन ची अट रद्द करुन दोन वर्षातुन एकदाच कामगाराला पोलिस व्हेरिफीकेशन मागण्यात यावे, कंत्राटदारांमार्फत कामगारांचे वेतन वेळेवर करण्यात यावे, ए. एम. सी टेंटरमधून अॅजनमेन हा शब्द वगळण्यात यावा, संच 8 आणि 9 हा महानगर पालिका हद्दीत येत असल्याने येथील कामगारांना महानगरपालिका वेतनश्रेनी नुसार वेतन अदा करण्यात यावे अशा सुचना सदर बैठकीत आमदार किशोर जोरगेवार यांनी सिएसटीपीएसच्या अधिका-यांना केल्या आहे. या बैठकीला सिएसटीपीएसच्या अधिका-यांसह सिटु, जनरल वर्कस युनियन, भारतीय कंत्राटी कामगार सेना, म.रा.वि.नि. रो.मज. सेना, महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक व कंत्राटी कर्मचारी सेना, महाराष्ट्र राज्य विद्युत कामगार संघ, प्रावर फ्रंट का. संघटना, महाराष्ट्र राज्य बहुजन कामगार संघटना, उलगुलान विद्युत कंत्राटी कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक व कंत्राटी कामगार सेना, महाराष्ट्र राज्य स्वतंत्र विद्यूत कंत्राटी कामगार संघटना, महाराष्ट्र राज्य कामगार सेना आदी युनियच्या पदाधिका-यांची उपस्थिती होती.

# पर्यायी ऊर्जा स्त्रोत देशाची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशाची उर्जेची वाढती मागणी, प्रदूषण अशा अनेक कारणांमुळे सौर ऊर्जा, कोल गॅसिफिकेशन सारख्या पर्यायी ऊर्जा स्त्रोतांची गरज निर्माण झाली असल्याचा सूर चर्चासत्रात उमटला. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, जिल्हा प्रशासन, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन, चंद्रपूर व असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय 'ॲडव्हांटेज चंद्रपूर 2024 - इंडस्ट्रियल एक्स्पो अँड बिझनेस कॉन्क्लेव्ह' च्या उद्घाटन सोहळ्यानंतर वन अकादमी येथील विद्युत हॉलमध्ये 'अल्टरनेटीव्ह एनर्जी सोर्सेस' विषयावर चर्चासत्र पार पडले.



या सत्राचे संयोजन मनपा आयुक्त विपिन पालिवाल यांनी केले. असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट अध्यक्ष गिरधारी मंत्री, न्यू ईरा क्लिनटेकचे व्यवस्थापकीय संचालक बाळासाहेब दराडे, सौर ऊर्जा अभ्यासक सुधीर बुधे, तज्ज्ञ गोपाल डेकाते यांनी सहभाग नोंदवला. नैसर्गिक वायू, तेल आदींच्या कमतरतेमुळे कोल गॅसिफिकेशनचा पर्याय समोर आला असून त्याद्वारे कार्बन डायऑक्साईड, हायड्रोजन, मिथेनॉल प्राप्त करता येऊ शकतो. कोल गॅसिफिकेशनसारख्या नाविन्यपूर्ण प्रयत्नाशिवाय देश आत्मनिर्भर होऊ शकत नाही, असे मत बाळासाहेब दराडे यांनी व्यक्त केले. सुधीर बुधे यांनी सौर उर्जेसंदर्भात मार्गदर्शन केले. सौर उर्जेत देशाची वाढती ऊर्जेची मागणी पूर्ण करता येऊ शकते. सौर ऊर्जेमुळे पर्यावरणाचे संरक्षण, ट्रान्समिशन लॉसेस कमी होणे, निरुपयोगी जागेचा वापर, विजेचे दर यामध्ये ग्राहकाला लाभ मिळेल, असे सांगितले.

गिरधारी मंत्री यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक कोटी घरांवर सौर पॅनेल लावण्याची योजना आखली असून त्या माध्यमातून युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळू शकतो, असे सांगितले. विविध अभ्यासक्रमांची गरज यावेळी उपस्थित मान्यवरांची सांगितली. यानंतर झालेल्या पॅनेल डिस्कशनचे संचालन प्राचार्य प्रविण पोटदुखे यांनी केले. यात चंद्रपूरातील शाळा, बगिचे, रस्त्यांवर सौर दिवे लावून मनपाला येणारे विजेचे बिल 50 टक्क्यांनी कमी करण्याचा मानस पालिवाल यांनी व्यक्त केला. उपस्थति तज्ज्ञांनी श्रोत्यांच्या शंकांचे निरसन केले. या सत्राचे सूत्रसंचालन श्यामल देशमुख यांनी केले. 'आर्यन अँड स्टील' 'मायनिंग अँड कोल' वर झाला संवाद : प्रभा हॉलमध्ये जिल्हा खनिज अधिकारी सुरेश नैताम यांच्या संयोजनात 'आर्यन अँड स्टील' विषयावर चर्चासत्र पार पडले. यात जिंदल स्टिल अँड पॉवरचे लिमिटेडचे अध्यक्ष हरविंदर सिंग, जिऑलॉजी अँड मायनिंग चे महाव्यवस्थापक डॉ. मनोज साहू, टाटा स्टीलचे सागर जैन यांचा सहभाग होता. 'मायनिंग अँड कोल' या चर्चासत्रात सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ मायनिंगचे राजेश रेहलान, ऑरो नॅचरल रिसोर्सेसचे संजय मिश्रा, आरोबिंदो रिॲलिटीचे व्ही.बी. सिंग व डब्ल्यूसीएलचे राकेश प्रसाद यांचा सहभाग होता.

# ब्ल्यू डायमंडच्या विद्यार्थ्यांचे स्काउट्स अँड गाईड्स प्रशिक्षण

## शपथविधी आणि कार्यशाळा सोहळा उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व भविष्यात सर्व विद्यार्थी देशासाठी चांगले नागरीक घडावेत.यासाठी भारत स्काउट्स अँड गाईड्स शपथविधी व कार्यशाळा या महत्वपूर्ण प्रशिक्षण सोहळ्याचे आयोजन लोणंद ता.खंडाळा येथील ब्ल्यू डायमंड इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना स्काउट्स अँड गाईड्सचे नियम समजावून सांगण्यापासून ते विविध प्रात्यक्षिके करून दाखविण्यापर्यंत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने प्रेरित करणारा हा उपक्रम संपन्न करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांनी अगदी उत्साहपूर्ण वातावरणात हे प्रशिक्षण अनुभवले. सोहळ्याची सुरुवात स्काऊट गाईडचे संस्थापक लॉर्ड बेडेन पॉवेल, लेडी बेडेन पॉवेल आणि सरस्वती पूजनाने झाली. यावेळी इन्स्पेक्टर ऑफ स्काऊटस अँड गाईड्स जिल्हा पुणेचे शमा शिकलगार व शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे यांच्या हस्ते हे पूजन करण्यात आले.



तदनंतर स्काऊटस अँड गाईड्स पॅट्रोल ने प्रार्थना सादर करण्यात आली. कवायत सादरीकरण आणि भारत स्काऊटस अँड गाईड्स ध्वजाला मानवंदना देण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते भारत स्काऊटस अँड गाईड्स ध्वजारोहण करण्यात आले. इन्स्पेक्टर ऑफ स्काऊटस अँड गाईड्स जिल्हा पुणेचे शमा शिकलगार, प्राचार्या दीप्ती मॅडम, शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे आदींच्या हस्ते इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांचा भारत स्काऊटस अँड गाईड्स शपथविधी सोहळा घेण्यात आला.शमा शिकलगार व दीप्ती मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांना भारत स्काऊटस अँड गाईड्स चे नियम, वचन, उद्देश, शिट्यांचे व हाताच्या खुनांचे स्काऊटस अँड गाईड्स मधील महत्व समजावून सांगितले. वेगवेगळ्या प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांचे टाळ्या,गाणी व खेळातून मनोरंजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध प्रात्यक्षिकात सहभागी होत मनमुराद पणे आनंद घेतला. मंत्र व प्रार्थना घेऊन भारत स्काऊटस अँड गाईड्स दोरीच्या वेगवेगळ्या गाठींचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांना मैदानी कवायतीचे प्रशिक्षण देण्यात आले.विद्यालयातील सर्व स्काऊट अँड गाईड पॅट्रोल ने सर्व प्रात्यक्षिक अतिशय चांगल्या प्रकारे सादर करण्यात आले. उत्कृष्ट सादरीकरणा साठी शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे,उपाध्यक्षा सुरेखा शेंडगे, सेक्रेटरी हेमलता दिक्षित, खजिनदार शुभांगी धसाडे, प्राचार्या दीप्ती मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व स्काऊट अँड गाईड शिक्षकांचे विशेष कौतुक केले.

# डॉ. लंके हेच जिल्ह्याचा कॅन्सर दूर करू शकतात !

## विवेक कोल्हे यांचे विखे पिता पुत्रांवर अप्रत्यक्ष शरसंधान

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीकांत चौरे**

**पारनेर :** अलिकडेच आमदार नीलेश लंके यांना डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. ते माणसांचे डॉक्टर नसले तरी चांगले, चांगले राजकीय आजार ते बरे करू शकतात.जिल्ह्याला लागलेला कॅन्सर आमदार डॉ.नीलेश लंके हेच दुर करू शकतात असे सांगत शंकरराव कोल्हे कारखान्याचे चेअरमन विवेक कोल्हे यांनी विखे पिता पुत्रांवर अप्रत्यक्ष शरसंधान केले. आ. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून आणि नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवपुत्र संभाजी या महानाट्याच्या तिसऱ्या दिवशी विवेक कोल्हे यांच्यासह अनेक राजकीय धुरिणांनी हजेरी लावली होती. यावेळी विवेक कोल्हे यांनी आ. लंके यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना जोरदार राजकीय फटकेबाजी केली.

कोल्हे म्हणाले, शिवप्रेरणा देणाऱ्या या महानाट्याचे आयोजन करून आमदार नीलेश लंके यांनी अनेकांचे राजकीय नाट्य थोपविले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आठरा पगड जाती, बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्माण केले. त्याच पध्दतीने शिवाजी महाराजांचे मावळे म्हणून आमदार नीलेश लंके सहकाऱ्यांना बरोबर घेऊन एक सुराज्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या हातून नगर दक्षिणमध्ये सुराज्य घडो यासाठी मी त्यांना शुभेच्छा देतो. आ. लंके यांच्या विचारांनी प्रेरीत होऊन त्यांचे सहकारी काम करीत आहेत. मुठभर मावळ्यांच्या साथीने छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमण परतवून लावले.आरंगजेबाच्या दरबारात जेंव्हा अपमान झाला त्याच ठिकाणी खडे बोल सुनावत महाराजांनी प्रत्युत्तर दिले होते. परखड आणि स्पष्ट बोलणारे नेते अशी आ. लंके यांची ओळख आहे.आपल्या रक्तात लाचारी नाहीच, त्याच पध्दतीने आ. लंके यांचे कार्य सुरू असल्याचे कोल्हे यांनी सांगितले. कोरोना काळात,संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात आदर्शवत असे काम आ. लंके यांनी केले.अतिशय धडपडीचा कार्यकर्ता म्हणून संपूर्ण महाराष्ट्र 'लोकनेते' म्हणून त्यांना ओळखतो.त्यांच्या हातून विशेषतः नगर दक्षिणची सेवा घडो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो असे सांगत कोल्हे यांनी आ. लंके यांच्या लोकसभेच्या उमेदवारीस पाठींबा दर्शविला.

**आ. लंके यांचा डंका वाजत राहो :** ३५० वर्षापूर्वी हा महाराष्ट्र धर्म टीकेल की बुडेल हा प्रश्न महाराष्ट्रापुढे, देशापुढे होता. त्यावेळी नियतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या खांद्यावर जबाबदारी दिली. शिवरायांनी महाराष्ट्र धर्म वाढविला. शिवरायानंतर महाराष्ट्र धर्म टिकविण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी आत्मबलीदान दिले आणि महाराष्ट्र धर्म आणि स्वाभीमान टिकविला. हा नियतीचा खेळ असतो. आज महाराष्ट्रातील माणसाच्या मनात एक प्रश्न निर्माण होतो महाराष्ट्राच्या राजदरबारात काय चालले आहे याचा. त्यामुळे नियतीने ही जबाबदारी आमच्या पुढच्या पिढीवर टाकलेली आहे. महाराष्ट्र धर्म टिकविण्यासाठी, स्वाभीमानाचा धर्म टिकला पाहिजे यासाठी एक शिलेदार उभा राहिला पाहिजे. नीलेश लंके यांच्यासारखा एक सामन्य गरीब घरातील तरूण जनतेने घडविला आहे. जनतेची ताकद त्यांच्या मागे आहे. त्यामुळे आ. लंके हे महाराष्ट्राचे लाडके झाले आहेत. त्यांचा डंका वाजत राहो. **प्रताप ढाकणे**



**लंके यांनी दक्षिणेत काम करावे ही जनभावना :** पुढच्या पिढीला शिवाजी महाराज, संभाजी महाराज यांचा खरा इतिहास कळावा, त्यांचे संस्कार रूजावेत यासाठी या महानाट्याच्या प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. एक आदर्श मावळा कसा असतो अशा पध्दतीने नीलेश लंके यांनी खडतर परिस्थितीत सवंगड्यांना बरोबर घेऊन पारनेर तालुक्याचा विकास केलेला आहे. निश्चितपणाने जो काम करतो त्याच्याकडून अधिकच्या अपेक्षा असतात. कोरोना काळात महाराष्ट्राने त्यांचे काम पाहिलेले आहे. त्यामुळे नगर दक्षिणमध्ये काम करावे अशी जनभावना आहे. ते पारनेर पलीकडे जाऊन लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करीत आहेत. त्याचे आनेकजण साक्षीदार आहेत. सध्या राजकीय नाट्य सुरू असून या नगरमधून काहीतरी बाहेर काढावे अशी अनेकांची इच्छा आहे. असा टोला विवेक कोल्हे यांनी लगावला.

**लंकेंचे व्यक्तीमत्व समुद्रासारखे व्यापक :** आ. लंके यांनी त्यांच्या मतदारसंघात मावळे जमा केले आहेत. बाहेरच्या मतदारसंघात ते मावळे एकत्र करीत आहेत. त्याला प्रतिसाद मिळतो आहे, त्याकडे तुम्ही कसे पाहता ? ते मावळे जमा करत आहेत असे मी म्हणणार नाही. परंतू समुद्राला नद्या येऊन मिळत असतात. आ. लंके यांचे व्यक्तीमत्व समुद्रासारखे व्यापक असल्याने अनेकजण त्यांच्या प्रवाहामध्ये सहभागी होत आहेत. लोकशाहीच्या दृष्टीने ही चांगली गोष्ट आहे. एका सर्वसामान्य माणसाला जनता डोक्यावर घेत असेल तर निश्चितच ते कौतुकास्पद आहे असे लंके म्हणाले.



# पाडेगाव फार्म केंद्राचा बालआनंद मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सातारा जिल्हा परिषद शिक्षण विभाग,पंचायत समिती (शिक्षण), शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम अंतर्गत पाडेगाव फार्म केंद्रातील १६ शाळांचा बाल आनंद मेळावा उत्साहात संपन्न करण्यात आला. विद्यार्थ्यांना विविध गाण्यावर नृत्य सादरीकरण केले. यावेळी मान्यवर, पालकवर्ग, शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागत व इशस्तवन तडवळे येथील विद्यार्थ्यांनी सादर केले. तसेच ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले आणि सरस्वती प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.नृत्यातून विद्यार्थ्यांचा कलाविष्कार पाहत असताना विद्यार्थ्यांकरीत टाळ्यांचा कडकडाट करण्यात आला.तसेच याच दरम्यान गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी फलटण पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अनिल संकपाळ, केंद्रप्रमुख बन्याबा पारसे, तडवळेचे सरपंच अशोक खराडे,उ पसरपंच संजय मदने,कोरेगावच्या सरपंच उज्वला शिंदे, शंकरराव दडस,शेखर काका खरात, अनिल विधाते, वृषाली ठोंबरे, संध्या होळकर, किसन भोसले, विठ्ठल भोसले,दत्तात्रय होळकर, अनिल बोबडे, अशोक गारडे, स्वाती दडस, अश्विनी दडस,सविता जाधव, तात्याबा जाधव, अश्विनी शिंदे, योगेश्वर विधाते,शितल पवार, पूनम चव्हाण, होळकर मॅडम,तेजश्री सरक,कल्याणी नरुटे, कृष्णराव सुळ,अपर्णा नरुटे,वैष्णवी कांबळे, लिलावती आवटे, दीपक खराडे,वैभव खराडे,दत्तात्रय जाधव, मोहिनी जाधव,मनीषा बागडे,प्रियंका जमदाडे, नीलम दणाने आदी लोक उपस्थित होते.

फलटण पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अनिल संकपाळ यांच्या हस्ते शिष्यवृत्ती धारक विद्यार्थिनी विजया मारुती शिंदे (मिरेवाडी), जिल्हा स्तर लांब उडी विजेता प्रणव नितीन सरक (मिरेवाडी), तालुका स्तर लांब उडी विजेता रुद्र संतोष बुधावले (रावडी बुद्रुक), राज्यस्तर सब ज्युनिअर ॲथलेटिक स्पर्धा विजेता शिवानी वैभव खराडे (तडवळे) या सर्वांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सर्व शाळांनी सांस्कृतिक कार्यक्रम साजरा केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास दिवटे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष नरूटे,शारदा डंगारे,प्रतिमा कुमठेकर यांनी केले तसेच आभार प्रदर्शन नवनाथ कोळपे यांनी मांडले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मनोज चव्हाण यांनी विशेष प्रयत्न केले.

# फर्दापूर सरपंचपदी रेणुका आगळे, उपसरपंच फिरोज पठाण बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील सरपंचपदी रेणुकाबाई दीपक (बाळू) आगळे तर उपसरपंचपदी फिरोज चांद खाँ पठाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली. येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सरपंच व उपसरपंचपदाची निवड सोमवारी अध्यासी अधिकारी एम. डी. धोंडकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली.निवड होताच जिल्हा परिषद सदस्य गोपीचंद जाधव यांनी शाल श्रीफळ देऊन मोठा सरपंच व उपसरपंच यांचा सत्कार केला. यावेळी सतरापैकी पंधरा सदस्यांनी सरपंच व उपसरपंच यांची बिनविरोध निवड केली. निवडणूक प्रकियेसाठी तलाठी सूरज गिरी, ग्रामविकास अधिकारी गणेश गवळी, गणेश विल्हाळकर, सुरेश शेळके, फिरोज तडवी यांनी सहकार्य केले.

यावेळी मनीषा भीमराव बोराडे, हिरा महारू चव्हाण, गुलाब बाबु बर्डे, अश्विनी दीपक लव्हाले, रत्नमाला सुरेश सोनवणे, फातेमाबी उस्मान पठाण, अब्दुल अजीज हमीद खा, दीपाली ईश्वर गायकवाड, राहुल बुधाजी दामोधर, शेख निसार मोहम्मद नूर योगेश पंडितराव शिंदे शकिलाबी शेख हुसैन आदी उपस्थित होते. सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुग्रीव चाटे, नीलेश लोखंडे, योगेश कोळी यांनी चोख बंदोबस्त ठेवला. तंटामुक्ती अध्यक्ष शेख मुक्तार मुन्सी, उस्मानखाँ पठाण, विजय तायडे, शेख जाकेर, विठ्ठल काकडे, मजीद पठाण, भीमराव बोराडे, शरीफ पठाण, अशोक जाधव, पिंटू आगळे, हाफीज पठाण, संतोष वेल्हाळ, हकीम पठाण आदीनी अभिनंदन केले.याप्रसंगी जि प सदस्य गोपीचंद जाधव, श्रावण राठोड, रमेश चव्हाण,जाकीर पठाण, राधेश्याम सरपंच इमान पठाण,भीमा बोराडे आदी मान्यवरांनी पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.



# सोयगाव येथे महाशिवरात्री व छत्रपती जन्मोत्सव महोत्सवाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** येथे विश्वशांती, विश्ववकल्याण, मानवी जिवनाचा आत्मओध्वआर, लोकशिक्षण, जनजागृती, समाजप्रबोधन व समाज निर्मितीसाठी आणि आदर्श गावांचा संकल्प श्रमशक्तीद्वारे, ग्रामविकासाकरिता वै.ह.भ.प.रायभान बाबा कोलते व वै.ह.भ.प.आनंदबुवा सपाटे यांच्या कृपाशीर्वादाने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दि.३/३/२४ ते ९/३/२४ गावकऱ्यांच्या वतीने हारि हारेश्ववर विठ्ठल रुक्मिणी मंदीरावर करण्यात आले आहे.तरी सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थाच्या वतीने गणेश खैरे व विशाल महाराज खडके यांनी केले आहे.श्रीमद भागवत कथा प्रवक्ता ह.भ.प.संजय महाराज गोंड ब्राम्हंदा आहेत.



हारि हारेश्ववर विठ्ठल रुक्मिणी मदीराचे सदस्य नेहमीच समाज प्रबोधन, सामाजिक कार्य असो की धार्मिककार्यअसो प्रत्येक कार्यात निस्वार्थपणे, हिरीरीने भाग घेऊन ते कार्य यशस्वीपणे पार पाडत असतात. अनेक धार्मिक उपक्रम यशस्वी करून दाखविले आहेत. समाज प्रबोधन करणेसाठी ह.भ.प.गजानन महाराज सोनुने आळंदी देवाची,ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज शेलुदकर,ह.भ.प.बाल किर्तनकार कृष्णा महाराज करमाड,ह भ.प.मोहन महाराज गारमोड मलकापूर,ह.भ.प.माईसाहेब महाराज जळगावकर,ह.भ.प.अंबादास महाराज लोखंडे पारध,ह.भ.प.संजय महाराज गोंड ब्राम्हंदा यांचे सकाळी ९ ते १२ काल्याचे कीर्तन,गायनाचार्य ह.भ.प.रमेश महाराज सोनुने,ह.भ.प.किशोर महाराज गावडे,ह.भ.प.विशाल महाराज खडके, भागवत महाराज महाजन, सोपान महाराज मानकर, सुनील महाराज चव्हाण, संदीप महाराज चव्हाण असणार आहे.भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन गणेश उत्तम खैरे यांच्या कडून करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी या अमृतवाणी चा लाभ घ्यावा असे आवाहन गणेश खैरे यांनी केले आहे.हरिहर विठ्ठल रुक्मिणी मंदिरवर महाप्रसादाचे आयोजन-१२ ते ३ या वेळेत केलेले आहे. सप्ताहात येणाऱ्या भाविक भक्तासाठी, महाराज मंडळीची राहण्याची व जेवनाची व्यवस्था विविध अन्नदात्यांनी केलेली आहे.त्याच प्रमाणे सप्ताहात चहापाणी व्यवस्था, पाणी व्यवस्था, जेवनाची व्यवस्था मंडप व्यवस्था, पत्रिका व साऊंड, जागा, व्हिडीओ शुटींग, विणेकरी, अशा गायक, वादक, टाळकरी, चोपदार अनेक जबाबदाऱ्या विविध दात्यांनी घेतलेल्या आहेत.त्यासाठी संपर्क-साधाः -९०४९२९१७२६,७२६४०४२०३३, ९६३७७१८९११, ७८७५१६०९५५ तरी सावळदबारा पंचक्रोशीतील भाविक भक्तानी व समाज बांधवानी या अमृत योगाचा लाभ घावा. असे आवाहन गांवकरी मंडळी व हरिहर विठ्ठल रुक्मिणी प्रतिष्ठानच्या वतीने प्रा जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते यांनी सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा यांनी केले आहे.

# भारतमातेसाठी सेवा : चंद्रकांत दादा मोरे

## भैरवचंडीमध्ये 11 हजार सेवेकऱ्यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**बाजीराव सोनवणे**

**नाशिक :** त्र्यंबकेश्वर येथील नियोजित सद्गुरु मोरेदादा चॅरिटेबल हॉस्पिटलच्या आवारात संपन्न झालेल्या भैरवचंडी सोहळ्यात राज्यभरातून आलेल्या 11000 महिला पुरुष सेवेकऱ्यांनी आपली सेवा रुजू केली. रविवारी झालेल्या या सोहळ्यात गुरुपिठाचे



महाव्यस्थापक चंद्रकांत दादा मोरे यांनी सांगितले की" ही सेवा आपण भारत मातेसाठीआणि सद्गुरु मोरेदादा हॉस्पिटल वेगाने पूर्णत्वास जावे म्हणून करत आहोत. गेली पाच वर्ष सातत्याने अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्ग आणि श्री स्वामी समर्थ गुरुपीठाच्या वतीने महिन्यातून दोनदा दुर्गाष्टमी आणि कालाष्टमीला भैरवचंडी सोहळा संपन्न होत आहे. या सेवेत आता प्रत्येक वेळी सहभागी सेवेकऱ्यांची संख्या वाढत आहे.
श्री दुर्गासप्तशती या ग्रंथाचे कालभैरवाष्टकसह पारायण या सेवेत करण्यात येते.
यानिमित्त उपस्थितांना मार्गदर्शन करताना चंद्रकांतदादा मोरे पुढे म्हणाले, "राष्ट्रभाव राष्ट्रभक्ती सतत जागृत राहावी, राष्ट्रअस्मिता सतत टिकावी, त्यातून विश्वबंधुत्वाचा खरा विशाल अर्थ उमजावा, संकीर्णतेच्या सर्व भिंती पडून जाव्यात, खऱ्या अर्थानेस्वातंत्र्य,समानता,न्याय,बंधुत्व या मूल्यांचे पालन व्हावे,माणसातला माणूस तेजस्वी बनवावा व मानवता सर्वत्र नांदावी यासाठी मानवी मनाला उत्तम संस्कार, उत्तम संदेश, प्रेरणा व श्रद्धा विश्वास यांची गरज आहे. ही गरज भागवणारे शाश्वत ग्रंथ भारत भूमीत निर्माण झालेले आहेत.काळाच्या ओघात त्यांचा विचार झाला नाही, किंबहुना ते विस्मरणात गेल्याने मोठी सामाजिक,सांस्कृतिक



हानी घडून आली आहे. बिकट संकटांनी ग्रासलेल्या भविष्यकाळाचा वर्तमानाचा विचार करता या ग्रंथांचा मागवा घेणे, त्यांच्या शब्द सामर्थ्याची प्रचिती घेणे, त्यात व्यक्त झालेल्या मंत्राक्षरांनी देवी भगवतीला आळवणे, प्रार्थना करणे, आवश्यक आहे. या हेतूने श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्म मार्ग दिंडोरी ने कोटीचंडी, अब्जचंडी अश्या सर्वोच्च सेवेचे आवाहन केले आहे. यापूर्वी शतचंडी, सहस्रचंडी, आयुतचंडी, लक्षचंडी अशा यागांची कल्याणकारी फलश्रुती सर्व सेवेकऱ्यांनी अनुभवली आहे.कारगिल युद्ध, मुंबई वरील अतिरेकी हल्ला, वेगवेगळ्या आजरांच्या साथी, दुष्काळ, जलप्रलय, त्सुनामी अश्या भयानक समस्या जेव्हा देश व समाजासमोर उभ्या राहतात तेव्हा तेव्हा सेवेकरी लाखोंच्या संख्येने एकत्र येऊन माता भागवतीस साकडे घालतात व माता भगवती त्यांच्या हाकेला धावून येते. पारायणा नंतर सर्वाना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# कात्रज प्राणिसंग्रहालयातून बिबट्या पसार ?

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कात्रज येथील राजीव गांधी प्राणिसंग्रहालयातून नर जातीचा बिबट्या पसार झाल्याची सोमवारी दुपारी पुढे आले. विलगीकरण कक्षातील पिंजऱ्यातील बिबट्या पळाल्याची माहिती कर्मचाऱ्यांकडून देण्यात आली. मात्र बिबट्या पिंजऱ्यातून बाहेर आला होता. तो प्राणीसंग्रहालयाच्या आवारातच होता. तो कर्मचाऱ्यांना सापडला असून त्याला बेशुद्ध करून पिंजऱ्यात बंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती महापालिका प्रशासनाकडून देण्यात आली. कात्रज येथील प्राणिसंग्रहालय पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे. या प्राणिसंग्रहालयात पश्चिम घाटातील जैवविविधता दर्शविणारे सस्तन प्राणी, पक्षी आणि सरपटणारे प्राणी अशा एकूण ६६ जातींचे प्राणी आहेत. प्राणिसंग्रहालयातील खंदक हे मोठे आणि नैसर्गिक आभासाचे आहेत. सध्या असलेल्या प्राण्यांमध्ये आशियाई सिंह, जंगली मांजर, लेपर्ड कट, जाएंट स्क्विरल, पिसोरी हरीण, खोकड, जंगली कुत्रे, तरस, लायन टेल मकाक या प्राण्यांचा समावेश आहे. तसेच याशिवाय वाघ, हत्ती, गवा, अस्वल, लांडगा, कोल्हा, शेकरू आदी प्राणीही येथे आहेत. काही दिवसांपूर्वी त्यामध्ये चौशिंगे, तरस आणि बिबट्या या प्राण्यांची भर पडली होती. या प्राणिसंग्रहालयात चार बिबटे असून, त्यातील तीन मादी आहेत. यातील नर जातीचा बिबट्या पिंजऱ्यातून पसार झाल्याचे सोमवारी पुढे आले. या बिबट्याला विलगीकरण कक्षातील पिंजऱ्यात ठेवले होते. त्याला हंपी येथील अटलबिहारी वाजपेयी प्राणिसंग्रहालयातून घेण्यात आले होते. दरम्यान, यासंदर्भात महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे यांनी मात्र बिबट्या पसार झाला नसल्याचे सांगितले.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार द्या

## ज्येष्ठ नेते विष्णू कसबे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार मिळावा यासाठी शिर्डी येथील विराट सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिर्डीत भव्य अशी भारतरत्न परिषद नुकतीच संपन्न झाली. या प्रसंगी अध्यक्ष भगवान गोरखे, मातंग समाजाचे नेते विष्णू कसबे, माजी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, निलेश सरोदे, नगरसेवक सुरेश आरणे, मंगेश त्रिभूवन, सुनील उमाप, संजय वाल्हेकर, प्रवीण सरोदे, मंजाबापु साळवे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.
याप्रसंगी बोलताना विष्णू कसबे म्हणाले की मातंग समाजाचे देशाच्या प्रगतीत व सामाजिक कार्यात मोठे योगदान असून देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ७६ वर्ष झाले तरी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा सन्मान सरकारने भारतरत्न पुरस्कार देऊन केला नाही. हा समाजावर मोठा अन्याय असल्याची सांगत आरक्षणाच्या माध्यमातून अनेक समाज प्रवाहात आले असताना मातंग समाज मात्र आजही या प्रवाहापासून दूर असून सरकारने लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये समाजातील तरुणांना संधी दिली पाहिजे, त्याबरोबर समाजातील मुलांनी शिक्षण घेऊन



आपल्या हक्कासाठी लढा दिला पाहिजे असे सांगत भारतरत्न पुरस्कार मिळावा यासाठी महाराष्ट्रात विविध ठिकाणी मेळाव्या घेणार असल्याचे स्पष्ट केले.
विष्णू कसबे पुढे म्हणाले की प्रदीप सरोदे यांनी पहिल्यांदा अशा प्रकारचा मेळावा घेऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला असून सरकारने ५३ लोकांना आतापर्यंत भारतरत्न पुरस्कार दिला आहे मात्र लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे कार्य मोठे असताना सरकारला साठे यांचा विसर पडला आहे. हा देखील समाजावर मोठा अन्याय असल्याचे सांगितले या पुढील काळात आपल्या हक्कासाठी समाजाची तरुणांनी लढा दिला पाहिजे त्याबरोबरच कार्यकर्त्यांची संघटनात्मक बांधणी करून समाजातील तरुणांना न्याय मिळावा यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे सांगत आता आपण आपल्या हक्कासाठी जागृत झाले पाहिजे. त्यासाठी लढा उभारण्यासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करावे असे आवाहन केले. याप्रसंगी विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून पदाधिकारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी विनोद वैरागर, सुनील उमाप, संजय भिस्ते, अनिल सरोदे, राजेंद्र आव्हाड, चंद्रकांत काळोखे, पत्रकार रामभाऊ पिंगळे, माऊली जगधने, निलेश जाधव, निलेश शेंडगे, किरण कोते, प्रसाद कोते आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते.

# संघाच्या माध्यमातून शेतकरी हिताचे निर्णय घेऊ : रावसाहेब पाटील शेळके



आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** केंद्र व राज्य सरकारच्या विविध प्रकारच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवल्या जातील व संघाच्या माध्यमातून शेतकरी हिताचे निर्णय घेतले जातील. स्व. दादापाटील शेळके यांना अभिप्रेत असेच काम करू असे प्रतिपादन नगर तालुका खरेदी विक्री संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष रावसाहेब पाटील शेळके यांनी केले. खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर ते बोलत होते. माजी मंत्री शिवाजीराव कर्डीले यांच्या नेतृत्वाखालील सर्व संचालक मंडळाला विश्वासात घेऊनच या पुढे निर्णय घेतले जातील. नगर तालुका खरेदी विक्री संघाने चांगले काम करून जिल्हाभर नावलौकिक मिळवावा,सभासदांच्या विश्वासाला तडा जाऊ देऊ नका असे मत भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष अक्षय कर्डीले यांनी व्यक्त केले. या वेळी बाजार समितीचे उपसभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सूळ, माजी सभापती विलास शिंदे, भाजप तालुका अध्यक्ष दीपक कार्ले, संचालक संतोष म्हस्के, रेवणनाथ चोभे, सुरेश सुंबे, विठ्ठल पठारे, गोपीनाथ फलके, मंगेश बेरड, राजेंद्र ससे, अजिंक्य नागवडे, अशोक कामटे, मंगल ठोकळ, मीना गुंड,जीवन कांबळे,संतोष पालवे, उत्कर्ष कर्डीले आदी उपस्थित होते. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शुभांगी गोंड यांनी काम पाहिले. नवनिर्वाचित उपसभापती डॉ. मिनानाथ दुसुंगे यांनी सर्वांचे आभार मानले.

# समर्पण मजदूर संघाच्या वतीने नेवासा येथे आज बांधकाम कामगारांचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** समर्पण फाऊंडेशन संचलित समर्पण मजदूर संघाच्या वतीने बुधवारी दि.६ मार्च रोजी नेवासा येथे बांधकाम कामगारांचा जिल्हास्तरीय मेळावा व त्यानिमित्ताने वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन नेवासा नगरपंचायत चौकात सायंकाळी ५ वाजता करण्यात आले असल्याची माहिती समर्पण फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी दिली.

या मेळाव्यामध्ये बांधकाम कामगारांच्या विविध प्रश्नांच्या बद्दल उहापोह केला जाणार आहे. तसेच असंघटित असलेल्या बांधकाम कामगारांना शासनाच्या योजना विनासायास मिळण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपायोजनाबद्दल विचारमंथन करण्यात येणार आहे. त्याचबरोबर कामगारांना आजपर्यंत मिळालेल्या वेगवेगळ्या योजनांचे शिष्यवृत्तीचे तसेच नुकत्याच सुरू झालेल्या भांड्यांच्या संचाचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात संपूर्ण राज्यात भेडसावणारा बनावट बांधकाम कामगार नोंदणीला आळा घालण्याविषयी विशेष ठराव करून शासन दरबारी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी. प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच समर्पण मजदूर संघाच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा यावेळी करण्यात येणार आहे.

मेळाव्यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त नितीनजी कवले, नेवासा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल, नगरपंचायतचे प्रशासकीय अधिकारी रामदास म्हस्के, समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष व कामगार नेते डॉ. करणसिंह घुले, नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन गायकवाड, इंजिनीयर सुनीलराव वाघ, इंजिनियर भास्करराव शिंदे, अनिल खंडागळे, दादासाहेब गंडाळ, आनंद सोलट, संपतराव बुळे, ठेकेदार दीपक परदेशी, राजेंद्र परदेशी, अनिल सोनवणे, बबन राजे, मच्छिंद्र गव्हाणे तसेच डेव्हिड साळवे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

होणाऱ्या जिल्हास्तरीय बांधकाम कामगारांच्या मेळाव्यास बांधकाम कामगारांनी तसेच समर्पण मजदूर संघाच्या सदस्यांनी व असंघटित क्षेत्रातील बांधकाम कामगारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समर्पण मजदूर संघाचे अध्यक्ष राजेंद्र थोरात व प्रवक्ते पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले आहे.

# माऊलींच्या 'पैस'खांबाचे महत्त्व सांगणारे तीर्थक्षेत्र नेवासा जगाला कळण्यासाठी प्रयत्न करा

## शिवलीलाताई पाटील यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** नगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराज यात्रा उत्सवाच्या निमित्ताने प्रसिध्द समाज प्रबोधनकार व कीर्तनकार हभप शिवलीलाताई पाटील यांच्या कीर्तनाला नेवासेनगरीत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आज ज्याचा प्रचार जास्त तिथंच लोक जास्त दिसतात असे चित्र दिसते,माझ्या माऊलींच्या पैस खांबाचे महत्व सांगणारे नेवासा तीर्थक्षेत्र जगाला कळण्यासाठी प्रयत्न करा हे तीर्थक्षेत्र मोठे होण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन ह.भ.प. शिवलीलाताई पाटील यांनी यावेळी बोलताना केले.

श्री मोहिनीराज यात्रा कमिटीच्या वतीने आमदार शंकरराव गडाख मित्र मंडळ यांच्या सौजन्याने मराठा बोर्डिंगच्या प्रांगणात आयोजित कीर्तन सोहळयाच्या प्रसंगी बोलताना हभप शिवलीलाताई पाटील म्हणाल्या ज्या संत ज्ञानेश्वर माऊलींनी जिथे ज्ञानेश्वरी सांगितली ती भूमी पवित्र आहे,भगवान विष्णूंनी मोहिनी अवतार घेतला ती हीच भूमी आहे, संत ज्ञानेश्वर माऊली जे भगवान विष्णूंचे अवतार आहे त्यांनी ग्रंथराज ज्ञानेश्वरीची रचना याच क्षेत्री केली म्हणून ज्ञानेश्वरी हीच आमची माय असून नेवासा हे ज्ञानेश्वरीचे गाव असल्याने ते माझे माहेर असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. आज जी तीर्थक्षेत्र मोठी झाली त्यांचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रचार झाला म्हणूनच लोक तेथे गर्दी करतात, तीर्थक्षेत्र ही सर्व सारखीच आहे. जिथे माऊलींनी पैस खांबास स्पर्श केला. पाठ लावली अशा खांबाला वारकरी माऊलींचे रूप मानतो. माऊलींच्या खांबाचे मंदिर सर्वांना कळावे म्हणून नेवासा तीर्थक्षेत्र देखील मोठे कसे होईल यासाठी प्रयत्न करा असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले. सर्व उपस्थित महिलांसह भाविकांना मंत्रमुग्ध करताना त्या पुढे म्हणाल्या की आज आपण विज्ञान विज्ञान करतो

मात्र संत ज्ञानेश्वर माऊलींनी साडे सातशे वर्षापूर्वीच ९० टक्के विज्ञान आम्हाला ज्ञानेश्वरीत सांगितले म्हणून ज्ञानेश्वरी महान ग्रंथ ठरला आहे, भगवंतापेक्षा श्रेष्ठ ज्ञान असणारे ज्ञानोबाराय हे आहेत, म्हणून ज्ञानेश्वरी कळली नाही तरी चालेल मात्र ज्ञानेश्वरी जीवनात वाचा,ज्ञानेश्वरीला तुम्ही कळले तरी आपल्या जीवनाचे कल्याण होईल, असा संदेश त्यांनी यावेळी बोलतांना दिला. भगवंतांच्या नामस्मरणात मोठी ताकद असून नामस्मरण हे पुण्य देणारे आहे,जीवनात पुण्य मिळविण्यासाठी भगवंतांचे नामस्मरण करा,दान करतांना त्याचा बोभाटा न करता दान करा,जीवनात आनंद घ्यायचा असेल तर काकडा आरती हरिपाठ नित्यनेमाने करा,वेदांचा सार व उपनिषदांचा अनुवाद व सर्व तत्वे ज्ञानेश्वरीत असल्याने जीवनात ज्ञानेश्वरीचे पारायण करा आजच्या काळात आईची जागा मोबाईलने घेतली असल्याने मुलांवर चांगले संस्कार करण्याचे काम आईवडीलांनी करावे,मुलांनी देखील आईवडीलांचा सन्मान करावा आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी झालेल्या कीर्तन सोहळयाच्या प्रसंगी यात्रा उत्सव कमिटीच्या वतीने हभप शिवलीलाताई पाटील यांचे संतपूजन करण्यात आले. सदर कीर्तन प्रसंगी हजारोंच्या संख्येने भाविक उपस्थित होते.प्रा.देविदास साळुंके सर यांनी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून उपस्थित भाविकांचे आभार मानले.

किर्तनानंतर माऊलींची कर्मभूमी असलेल्या पैस खांब मंदिरासह भगवान विष्णूंचे स्त्रीरूप दर्शन असलेल्या श्री मोहिनीराजांच्या मंदिरात जाऊन शिवलीलाताईंनी दर्शन घेतले येथे ही शिवलीला ताईंचा सन्मान करण्यात आला.दोन्हीही देवालये भगवान विष्णूंचेच रूपे असल्याने त्यांनी दर्शन घेत या भूमी बद्दल समाधान व्यक्त केले.यात्रा कमिटी सदस्य व आमदार शंकरराव गडाख यांच्या सौजन्याने कीर्तन सोहळा हा उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडल्याबद्दल शिवलीला ताईंनी सर्व सदस्यांचे कौतुक केले तर नेवासकर नागरिकांनी धन्यवाद देत आभार मानले.

# राज्यातील वीज पुरवठा धोक्यात!

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाराष्ट्र राज्य वीज मंडळ कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वात राज्यातील महावितरण, महानिर्मिती, महापारेषणमधील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी नुकतेच दोन दिवस संप केला. त्यानंतरही मागणीकडे कुणी लक्ष दिले नसल्याने हे कर्मचारी ४ मार्चच्या मध्यरात्रीपासून बेमुदत संपावर गेले आहे. राज्यातील अनेक भागात एकीकडे तापमान वाढत असताना दुसरीकडे कर्मचारी संपाने वीजपुरवठ्यावर परिणामाचा धोका आहे.

कंत्राटी वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे शासन आणि वीज कंपन्यांकडून लक्ष दिले जात नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांची कृती समिती व सरकार समोरा- समोर आले आहे. या दोघांच्या वादात वीज यंत्रणा विस्कळीत होऊन सर्वसामान्य व्यक्ती भरडला जाण्याचा धोका आहे.

दरम्यान महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्यांमध्ये सुमारे ४२ हजार कंत्राटी कर्मचारी आहेत. या कर्मचाऱ्यांकडून सातत्याने तिन्ही वीज कंपन्यांतील रिक्त पदांवर कंत्राटी कामगारांना सामावून घ्या, हे कंत्राटी कर्मचारी स्थायी होईपर्यंत तेथे नियमित पदभरती करू नकासह इतरही मागणी केली जात आहे.

ही मागणी मान्य होत नसल्याने हे कर्मचारी २८ आणि २९ फेब्रुवारीला संपावर होते. याप्रसंगी कृती समितीने शासनाला कंत्राटी कर्मचाऱ्यांची मागणी मान्य न झाल्यास ५ मार्चपासून बेमुदत संपाचाही इशारा सरकार आणि तिन्ही कंपनी प्रशासनाला नोटीस देऊन दिला होता. त्यानंतरही या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले गेले नाही. त्यातच एकीकडे विजेची मागणी वाढत असताना दुसरीकडे कंत्राटी कामगारांच्या संपाने वीजनिर्मिती वा वीजपुरवठा प्रभावीत झाल्यास जबाबदार कोण? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

१ )तिन्ही वीज कंपनीतील रिक्त पदांवर कंत्राटी कामगारांना सामावून घ्या.

२ )कंत्राटी कर्मचारी स्थायी होईपर्यंत तेथे नियमित पदभरती करू नका

३ )कंत्राटी कामगारांच्या एकूण पगारात १ एप्रिलपासून ३० टक्के वाढ करा.

# ग्रामसेवकाचा हेकेखोरपणापणा

## माहिती देण्यास टाळाटाळ

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** तालुक्यातील सुनगाव येथे वार्ड नंबर एक मधील नाली व पेवर ब्लॉक रोडचे काम चालू आहे याबाबत गजानन मारोती धुळे यांनी ग्रामपंचायतीला 28 2 2024 रोजी या कामाचे अंदाजपत्रक व कार्यारंभ आदेश अर्जाद्वारे ग्रामपंचायतला मागितलेला आहे परंतु ग्रामसेवकांनी त्यांना आज पाच ते सहा दिवस लोटल्या नंतरही कोणत्याच प्रकारची माहिती अंदाजपत्रक व कार्यारंभ आदेश किंवा माहिती दिली नाही.

येथीलच गजानन खिरोडकर देशोन्नती पत्रकार यांनी सात ते आठ दिवसाअगोदर ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जाऊन घरकुल यादी व घरकुलासंबंधी माहिती जनतेच्या आग्रहस्तवर बातमीची मागणी केली आहे परंतु अजूनही गजानन खिरोडकर देशोन्नती पत्रकार यांना ग्रामसेवक हितेंद्र जोशी यांनी कोणत्याच प्रकारची माहिती पुरविली नाही ग्रामसेवक हे जाणून-बुजून माहिती देत नाहीत असा आरोप अर्जदारांनी केलेला आहे नियमनुसार नागरिकांनी केलेल्या अर्जा नुसार ग्रामपंचायत कार्यालयाला ती माहिती देणे बंधनकारक असते व पत्रकाराला बातमीसाठी आवश्यक असलेली माहिती ही ग्रामसेवकाने द्यायला हवी परंतु ग्रामसेवक हे मनमानी कारभार करीत असल्यामुळे ग्रामसेवक माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहे व उडवाउडवी ची उत्तरे देत आहेत तरी याबाबतीत पंचायत समिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्वरित चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.

# महावितरणच्या जनमित्रांचा गौरव; लाईनमन दिवस उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या जनमित्रांबाबत कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महावितरण छत्रपती संभाजीनगर परिमंडलाच्या वतीने सोमवारी (4 मार्च) लाईनमन दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जनमित्रांचा गौरव करण्याबरोबरच विद्युत सुरक्षेची शपथ देण्यात आली. महापारेषणच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहव्यवस्थापकीय संचालक राहुल गुप्ता, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे होते. मंचावर अधीक्षक अभियंता शांतीलाल चौधरी, प्रवीण दरोली, प्रेमसिंग राजपूत (प्रभारी) यांचीही उपस्थिती होती.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक गुप्ता यांनी लाईनमन दिवसाच्या शुभेच्छा देऊन जनमित्रांच्या सर्व अडचणी सोडवण्याचे आश्वासन दिले. तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक जनमित्र उत्कृष्ट ग्राहकसेवा देत आहेत. याबरोबरच सर्वांनी वीज हानी व वीजबिल थकबाकी कमी करण्यासाठीही प्रयत्न करावेत. डॉ.केळे म्हणाले की, ऊन, वारा, पावसाची तमा न बाळगता ग्राहकांना चांगली सेवा देण्यासाठी जनमित्र रात्रंदिवस काम करत असतात. त्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे. तथापि, वीजबिलांच्या प्रचंड थकबाकीमुळे कंपनीसमोर आर्थिक आव्हान आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे.

अतिरिक्त कार्यकारी अभियंता व्यंकटेश पेन्सलवार यांनी विद्युत सुरक्षेबाबत जनमित्रांचे प्रबोधन केले. जनमित्रांच्या वतीने अभय एरंडे, सदानंद जाधव, श्रद्धा भवरे, संदीप चाटे यांनी मनोगत व्यक्त केले. वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रत्येक उपविभागातील एका जनमित्राचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यात सय्यद अकबर, दीपक थत्तेकर, सुषमा गोरे, विशाल घायाळ, अनिल मोकासरे, सतीश जाधव, मनोज सोनवणे, सुधाकर नागरे, भीमराव साबळे, सागर गोरे, उद्धव मुंढे, दीपक दांडगे, योगेश राऊत, अनिल पाचवणे, रमेश जाधव, गोरखनाथ गोर्डे, विनोद चांदवडे, अंकुश आगळे, ज्ञानेश्वर राठोड, व्ही.यू. दामोधर, एस.एन. आगे, नितीन शेळके, रत्नाकर तळेकर, दादासाहेब भुजाडे, मनोज गवळी यांचा समावेश आहे.

उपमहाव्यवस्थापक (प्रभारी) चंद्रकांत खाडे, सहमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी) किशोरी तळेले यांनी लाईनमन दिवसाच्या शुभेच्छा देऊन जनमित्रांच्या कामाचा गौरव केला. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास सहायक महाव्यवस्थापक (प्रभारी) स्वाती चव्हाण-गाडेकर, कनिष्ठ विधी अधिकारी सुनील पावडे, कार्यकारी अभियंता सतीश खाकसे, प्रेरणा बनकर, महेश पाटील, भूषण पहुरकर यांच्यासह शहर व ग्रामीण मंडलातील अभियंते व जनमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# डॉक्टर उज्वला शिरसाठ यांचा राष्ट्रीय बालरोग परिषदेत सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** साईबाबा संस्थान शिर्डी संचलित श्री साईनाथ रुग्णालयाच्या बालरोग तज्ञ डॉ. उज्वला शिरसाठ, यांना कोची येथे आयोजीत राष्ट्रीय पातळीवरील पेडीकॉन -२०२४ या परिषद नुकतीच पार पडली त्यात सहभाग घेतला होता देशभरातुन भारतीय बालरोग तज्ञ सहभागी झाले होते डॉ शिरसाठ देशभरातील बालरोग तज्ञाच्या समोर बालरोगाविषयी माहिती सादर केली. देशभरातुन फक्त ५० व्याख्यात्यांची निवड करणेत आलेली होती य या परिषदेत लहान मुलांना बराच वेळ दम छाटण्याचा भास होत असेल तर अशावेळी काय उपाय योजना करावयात, नविन विवाह झालेल्या जोडप्यांनी नविन जन्माला येणाऱ्या बालकाला अनुवंशीक आजार उदभवु नये यासाठी काय काळजी घ्यावी. जर विवाह नात्यामध्ये असेल तर या आजारांची पुनरावृत्ती पुढील पिढीमध्ये होणयाची दाट शक्यता असते, अनुवंशीकतेच्या आजारामुळे होणारे लहान मुलांचे मृत्युदर कमी करायचे असेल तर शक्यतो जवळच्या रक्तांच्या नात्यातील विवाह करणे टाळावेत, अनुवंशीक आजार भविष्यात पिढयानपिढया होवु नये म्हणुन काय उपाय योजना करावयात, समाजात सदृढ बालके कशी निर्माण होतील यासह वैद्यकीय तपासणी करुनच विवाह जोडावेत याविषयीच सादरीकरण त्यांनी केले. करीता त्यांना सदरील परिषदेत प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आलेले आहे. डॉ.उज्वला शिरसाठ यांनी यापुर्वीही अनेक राष्ट्रीय परिषदेत मानद वक्ता म्हणुन सहभाग नोंदविलेला आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात बालरोग विभागात कार्यरत असलेल्या डॉ.उज्वला शिरसाठ यांना राष्ट्रीय स्तरावर आयोजीत बालरोग तज्ञाच्या परिषदेत मानद वक्ता म्हणुन आमंत्रीत करण्यात आल्याने श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या श्री साईनाथ रुग्णालयाच्या नावलौकीकात आणखी भर पडलेली आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कामे दर्जाहीन, प्रशासकाचेही दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात सद्या मंत्री आमदार खासदार यांच्यात विकास कामांना निधी देण्याची स्पर्धा लागली असुण तालुक्यात सर्वत्र विकास कामेच कामे सुरु असल्याचे चित्र आहे.

मंत्री डॉ कराड, खासदार इम्तियाज जलील, आमदार अंबादास दानवे पाटील, आमदार सतिष पाटील चव्हाण, विद्यामान आमदार प्रशांत भाऊ बंब यांच्यात तालुक्यात विकास कामांना निधी देण्याची जणु स्पर्धाच लागली की काय? असे चित्र दिसून येत आहे. लोकसभेचे निवडणूकीचे पडघम वाजू लागले आचारसंहिता लागू झाली नाही ती केंव्हा लागु शकते तर तद्नंतर विधानसभा निवडणुक बघता की काय? खुलताबाद तालुक्यात सध्या मंत्री डॉ कराड यांनी विकास कामांना निधी देवून कामे केली सुरु आहे. तर खासदार इम्तियाज जलील यांनी ही तालुक्यात ठिकठिकाणी निधी देवून विकास कामांना चालना दिली.तर आमदार विरोधी पक्षनेते अंबादास दानवे पाटील यांनी पुर्वी व शेवटच्या टप्प्यात ९५कोटी व पुर्वी कोटीने रुपये निधी देवून तालुक्यात अनेक विकासात्मक कामे उभारली आहे. तर आमदार सतीश भाऊ पाटील चव्हाण यांनी तर खुलताबाद तालुक्यात विकास निधी देण्याचा धडकाच लावला आहे. तर विद्यामान आमदार प्रशांत भाऊ बंब यांनी तर आपली विकास कामाची गती सतत सुरुच ठेवली असुण पुन्हा त्यास गती देत वेग वाढविला आहे.खुलताबाद तालुक्यात सर्वत्र ठिकठिकाणी सिमेंट रस्ते करणे, पेव्हर ब्लॉक बसवणे,सामाजीक सभागृह उभारणे, इमारती उभारणे,ईदगाह विकास, कब्रस्थान संरक्षण भिंती करणे, दुरुस्ती रंगरंगोटी आदि व विविध विकासात्मक कामांची रेलचेल सद्या तालुक्यात सुरु आहे.व मंत्री खासदार आमदार यांच्यात विकास कामांना निधी देण्याची स्पर्धा लागली आहे.मात्र यात कामे निकृष्ट दर्जाहिन थातुरमातुर कामे होत असुण याकडे प्रशासनाने स्पेशल पाठ फिरवली व दुर्लक्ष करून आहे यात ठेकेदारांची चांदी होत आहे. निधी कोणीही देवो ती तर शासन व जनतेची आहेना मग कामाकडे दुर्लक्ष का? म्हणून वरिष्ठांनी यात लक्ष घालावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



# उन्नती शेतकरी गटाने पटकावला राज्यात दुसरा क्रमांक, आमदारांच्या हस्ते सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोबलगाव :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथील पाणी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप २०२३ मधे राज्यात व्दितीय क्रमांक पटकावला आमदार सतिश भाऊ चव्हाण यांनी महिला उन्नती शेतकरी गटाचे सत्कार केला.खुलताबाद तालुक्यात गट शेती चळवळीत महिला गटाने उत्कृष्ट कार्य केले व शेतीत नैसर्गिक संकटाला सामोरे जावुन निसर्ग पूरक पध्दतीचा वापर करित शेतीत लागवडीसाठी खर्चात मोठी बचत केली व उत्पन्नात वाढ केली व स्थान मिळवला व राज्यात दुसरा क्रमांक पटकावला याबद्दल सर्वत्र कौतुक अभिनंदन व होत आहे तर आमदार सतिष भाऊ चव्हाण यांनी महिलांचे गावी जावुन सत्कार केला.

# तुमच्या हातून चांगले कार्य घडावे

## शैलजा खरात : मोफत इंग्रजी वर्गास भेट

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** गेली दोन महिन्या पासून समस्त खरात हितकारी संस्थेच्या वतीने लोणंद ता.खंडाळा येथील पंचशील बुद्ध विहारात लहान मुला मुलींसाठी मोफत इंग्रजी शिक्षण दिले जात आहे.हे शिक्षण देण्यासाठी शिक्षिका म्हणून ज्ञानेश्वरी कांबळे ह्यांची नेमणुक केलेली आहे. शालेय मुला मुलींना अगदी सोप्या आणि समजेल अशा भाषेत त्या शिकवण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेक जण या उपक्रमास सदिच्छा भेट देऊन त्यांचे सुद्धा कौतुक करत आहेत.लोणंद नगरीच्या माजी नगरसेविका शैलजा खरात यांनी सुद्धा मोफत इंग्रजी वर्गास सदिच्छा भेट देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.शिवाय शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांचे सुद्धा तोंडभरून कौतुक केले.विद्यार्थ्यांशी संवाद साधताना माजी नगरसेविका शैलजा खरात म्हणाल्या की,तुम्ही चांगलं घडावं,तुम्ही तुमच्या पायावर उभं राहावं,एक उच्च शिक्षण घ्यावं,तुम्ही काहीतरी बनावं ही माफक इच्छा आहे.तुमच्या हातून काहीतरी चांगलं कार्य घडावं.तुमच्यातूनच अधिकारी घडावेत. तुमच्याच मुळे गावाच्या नावासोबतच देशाचे नाव सुद्धा रोशन होईल.असा विश्वास सुद्धा त्यांनी मुला मुलींच्याप्रति व्यक्त केला.यावेळी शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांचे कौतुक करताना माजी नगरसेविका शैलजा खरात म्हणाल्या की,माझी मुलं ह्यांच्या हातून घडलेली आहेत. माझी मुलगी डॉक्टर झाली. माझी दोन्ही मुले इंजिनियर झाली. माझ्या मुलांच्या शिक्षिका ह्या आहेत.माझी एक पिढी घडलेली आहे. आता दुसरी पिढी त्या घडवत आहेत.त्या कशा पद्धतीने शिकवित असतात.मी त्यांच्या ह्या कार्याची पोचपावती देत आहे. माझ्या मुलांना त्यांनी खुप चांगल्या पद्धतीने घडविलेले आहे. खरच हा उपक्रम खूप महत्वाचा आहे.बहुजन समाजातील सर्व मुले मुली तुमच्या हातून घडत राहोत.अशा शुभेच्छा सुद्धा माजी नगरसेविका शैलजा खरात यांनी दिल्या.त्या शिकवत आहेत. यापुढे ही चांगल्या शिकवतील ही माझी गॅरंटी आहे, असा विश्वास सुद्धा त्यांनी व्यक्त केला. तुम्ही वेळात वेळ काढून इथे आलास आणि मला प्रोत्साहन दिले.याबद्दल मी खूप खूप आभारी आहे.ही मुलं खूप चांगली घडतीलच असा माझा विश्वास आहे.मी जे काही त्यांना देत आहे ते अगदी आत्मविश्वासाने देत आहे.सुरुवातीला मुले कमी होती.परंतु आता ७५ पेक्षा जास्त आहेत.मी एक अनुभवी शिक्षिका आहे.माझ्या वर्गात शंभर जरी मुले असली तरी माझा असा आत्मविश्वास आहे की,मी व्यवस्थितपणे शिकवू शकते.माझं शिकविणे जसं पसरत गेलं.तशी मुलांची संख्या वाढत गेलेली आहे.दयाभाऊ खरात यांचे खूप आभार मानते की,त्यांनी मला इथे शिकविण्याची संधी दिली.रवींद्र शहा यांनी वह्या पुस्तके दिली.त्यांचाही खूप मोलाचा वाटा आहे.असे सुद्धा शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांनी म्हटले.विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मिती निर्माण करणे हे शिक्षकांचे काम असते.त्यांच्यातील नवनिर्मितीला वाव दिला पाहिजे. ते काम मी एकदम बेमालूम पणे करू शकते.आणि ते मी केलेले आहे. शिकविणे हे माझे काम आहे.जिद्दीने मी हे काम करते. शिकविण्यावर माझे फार प्रेम आहे.माझा विद्यार्थी हा उत्तमच शिकला पाहिजे. विद्यार्थ्यांचे ध्यान पूर्णपणे शिक्षणाकडे वळवायचे.कोविडमध्ये मुले इतकी खाली आलेली आहेत.इंग्रजी विषयाचेच नव्हे तर सर्वच विषयांचा पाया ढासळलेला आहे.इंग्रजीचा तर गंधच नसतो. अशा परिस्थितीत दयाभाऊ खरात यांनी मला जी मुलांना शिकविण्याची संधी दिली.त्याबद्दल त्यांचे शतःश आभारी आहे, असे सुद्धा शिक्षिका ज्ञानेश्वरी कांबळे यांनी म्हटले. मुलांची संख्या वाढत असताना आपल्या लक्षात येतं की आपल्या चांगल्या शिकविण्याचा प्रसार होत आहे.ही संख्या अशीच वाढत राहो.आम्ही सर्वांना शिकविण्यासाठी सज्ज आहोत.असे सुद्धा त्यांनी म्हटले.मुले घरचा अभ्यास व्यवस्थित करत आहेत की नाहीत ? त्यांना अभ्यासाची गोडी लागलेली आहे की नाही? एखादा मुलगा आळशी असेल तर त्याला कसं शिक्षण प्रवाहात आणायचं याबद्दल सुद्धा त्यांनी सांगितले.इंग्रजी वाचणे आणि लिहिणे हे शिकवित असताना स्पेलिंग कसे बनवायाचे,उच्चार कसे करायचे,प्रत्येक बाराखडीचा उच्चार आदी शिक्षणप्रक्रिया मोफत इंग्रजी शिक्षण वर्गात पार पडत आहे.या मोफत शिकवणी वर्गातील मुला मुलींच्या अभ्यासा बद्दल माहिती जाणून घेता आल्याने माजी नगरसेविका शैलजा खरात यांनी विशेष समाधान व्यक्त केले.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर आधारित श्रवणयंत्राचे राजीव स्पीच अँड हिअरिंग एड क्लिनिकमध्ये लाँच

आधुनिक केसरी न्यूज

संजय व्यापारी

**छत्रपती संभाजीनगर :** श्रवणदोष एक असे अपंगत्व आहे की त्यामुळे व्यक्ति समाजापासून दूर जाते. एकमेकांशी संवाद न साधता आल्यामुळे ती व्यक्ति एकलकोंडी होते. आज भारतात एकूण ६.३ कोटी लोक कर्णबधिरत्वाने अथवा बहिरेपणामुळे पिडीत आहेत. वैज्ञानिक संशोधनानुसार असेही आढळुन आले आहे की श्रवणदोष किंवा बहिरेपणाकडे दुर्लक्ष केले की त्या व्यक्तिला स्मृतीभ्रंश किंवा स्मरणशक्तीचा आजार होऊ शकतो. यावर मात करण्यासाठी राजीव स्पीच अँड हिअरिंग क्लिनिकने मात्र अत्यंत आधुनिक व सर्वात लहान, कानात न दिसणारे स्टार की कंपनीचे जेनेसीस श्रवणयंत्र मराठवाड्यातील लोकांसाठी सज्ज केले आहे. या श्रवणयंत्राची वैशिष्टे १) हे श्रवणयंत्र ए. आय वर आधारित असून बाजुबाजुचे आवाज, गोंगाट कमी करुन बोलण्याचे आवाज मोठे करण्याचे काम करते. २) त्याचबरोबर हे श्रवणयंत्र न्युरोप्रोसेसरचे देखील काम करते. थोडक्यात हे मेंदूतील ऑडीटरी सिस्टीमप्रमाणेच कार्य करते. ३) या श्रवणयंत्रातील हेल्थ ट्रॅकींग सेन्सर्स व्यक्तिच्या हालचालींचे निरीक्षण तर करतेच तसेच व्यक्ति जर पडली किंवा अपघात झाला तर इतर संबंधित व्यक्तिंना सुचना देखील देते. ४) हे श्रवणयंत्र अनेक भाषेत भाषांतरीत करुन यंत्र वापरणाऱ्यास भाषा समजण्यास मदत करते. ५) जगातील सर्वांत लहान कानामागील यंत्र तसेच कानाच्या आतील यंत्र म्हणजेच स्टार की कंपनीचे जेनेसीस श्रवणयंत्र. ६) हे श्रवणयंत्र चार्जेबल असुन



त्याचे चार्जिंग ५१ तासांपर्यंत राहते. ७) हे श्रवणयंत्र अँड्रॉइड तसेच आयफोन ला ब्लुटुथ प्रमाणे कनेक्ट होते.
एका मिनिटाला २२००० वेळेस आवाजाचे पृथःकरण करणारे हे श्रवणयंत्र म्हणजे ऐकणाऱ्याला पर्वणीच आहे. असे प्रतिपादन यंत्राचे लाँचिंग करतांना स्टार की इंडीयाचे मॅनेजिंग डायरेक्टर अखिल चौहान म्हणाले.
राजीव स्पीच अँड हिअरिंग एड क्लिनिकतर्फे या यंत्राचे अनावरण करतांना श्रवणतज्ञ प्रिया भाले, म्हणाल्या की वर्ल्ड हिअरिंग डे च्या निमित्ताने हे श्रवणयंत्र मराठवाड्यासाठी उपलब्ध करुन देतांना मला अत्यंत आनंद होत आहे.
राजीव स्पीच अँड हिअरिंग क्लिनिक वाचा व श्रवण क्षेत्रात मराठवाड्यातील अग्रेसर क्लिनिक असून अनेक सुविधा पूर्ण मराठवाडा व आजुबाजूच्या परिसरात येथे प्रथमच सुरु केल्या गेल्या आहेत. यामध्ये 1.वाचा व श्रवणक्षेत्राची सुरवात 2.कॉक्लीअर इंम्प्लांट पुनर्वसन 3.हिअरिंग एड बँक 4.वाचा, भाषा व आवाजाचे पुनर्वसन अशा अनेक सुविधा राजीव स्पीच अँड हिअरिंग क्लिनिकने मराठवाड्यात प्रथमच सुरु केल्या आहेत आणि यामध्ये आर्टीफिशियल इंटेलिजन्स वर आधारित श्रवणयंत्राची भर पडली आहे. क्लिनिकतर्फे आजपर्यंत ७०० पेक्षा जास्त कर्णबधिर मुलांचे कॉक्लीअर इंम्लांट पुर्नवसन राजीव क्लिनिक तर्फे करण्यात आले आहे. आज ही सर्व मुलं आपापल्या क्षेत्रात चमकत आहेत. याचबरोबर १० हजार पेक्षा जास्त व्यक्तिंना श्रवणयंत्र देण्यात आले आहेत व त्याहीपेक्षा जास्त वाचाविकारांवर उपचार करण्यात आले आहेत. राजीव क्लिनिकच्या सर्वेसर्वा श्रवणतज्ञ प्रिया भाले या अनेक पुरस्कारांच्या मानकरी ठरल्या आहेत. राजीव क्लिनिक तर्फे वर्ल्ड हिअरिंग डे च्या निमित्ताने कर्णबधिर मुलींना डिजिटल हिअरिंग एड डोनेट करण्यात आले आहे. तसेच राजीव क्लिनिकतर्फे संपूर्ण महिनाभर जेनेसीस या श्रवणयंत्रांवर आकर्षक सुट मिळणार आहे.

# महाशिवरात्र निमित्ताने घृष्णेश्वर देवस्थान सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरुळ येथे ८मार्च शुक्रवार पासून महाशिवरात्रीस प्रारंभ होत आहे. १२ वे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री क्षेत्र वेरुळ येथे महाशिवरात्र यात्रा महोत्सव सुरळीत पार पाडण्या करीता श्री घृष्णेश्वर देवस्थान ट्रस्ट आणि प्रशासन व लोकप्रतिनिधी यांची गुरुवारी विशेष बैठक घेण्यात आली. याबैठकित वेरुळ परिसरातील ग्रामस्थांना आधार कार्ड दाखवून थेट मंदिरात दर्शनासाठी प्रवेश देण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी संतोष गोराड यांनी सांगितले. तसेच भविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व त्यांना सुलभतेने दर्शन घेता यावे, कुठलाही अनुचित प्रकार घडू नए, पार्किंग, प्रवाशांच्या सेवेसाठी परिवहन महामंडल सेवा, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग, भारतीय पुरातत्व विभाग, महसूल विभाग, वन विभाग, अग्निशामक दल , वेरुळ ग्रामपंचायत आदि सम्बंधित बैठक उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. याबैठकीत दिनांक ७, ८ आणि ९ मार्च दरम्यान पोलीस प्रशासन आणि यांनी विशेष काळजी घेण्याच्या सूचना उपविभागीय पोलिस अधिकारी विजयसिंह ठाकूरवाड यांनी केल्या. यावेळी तहसीलदार स्वरूप कंकाळ, गटविकास अधिकारी प्रकाश नाईक, पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनिल जोशी, विश्वस्त चंद्रशेखर शेवाळे, उपसरपंच विजय राठोड, माजी सरपंच सुरेश ठाकरे, राजेश वाकलेकर, आम आदमी पक्षाचे प्रदेश युवा संघटनमंत्री सतीश लोखंडे, राजेंद्र कौशिके, गणेश हजारी, अनिल आव्हाड, सुनील लोखंडे, यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# आंबेडकरवादी संघर्ष समितीच्या जिल्हाध्यक्षपदी विनोद कासारे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** आंबेडकरवादी संघर्ष समितीची महत्वपूर्ण बैठक दिनांक ३ मार्च रोजी सुभेदारी विश्रामगृह येथे जेष्ठ नेते मा.रामराव दाभाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीमध्ये समितीच्या कामाचा विस्तार करणेसाठी जिल्हा,शहर, नविन शहर, तालुका कार्यकारिणी करण्यात येऊन आंबेडकरवादी विचारधारेवर काम करणाऱ्या तरुणांना संधी देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाध्यक्ष पदी विनोद कासारे यांची तर जिल्हा कार्याध्यक्ष संजय जाटवे, जिल्हा सरचिटणीस म्हणून नवल सुर्यवंशी यांची निवड करण्यात आली, त्यांना नियुक्तीचे पत्र समितिचे अध्यक्ष श्रावणदादा गायकवाड यांच्या हस्ते देण्यात आले. त्यांच्या निवडीबद्दल नानासाहेब शिंदे, उत्तम जाधव, किशोर गडकर, वसतराज वक्ते,बाळुभाऊ वाघमारे, बाळु गंगावणे, संतोष मोकळे, कमलेश चांदणे, राम भालेराव, सुनील खरात, सुनील अंभोरे, सुनील अवचरमल, प्रविण खरे, संतोष आकोदे, अंकुश शिंदे, अरूण खरात, वीजय मोरे शेजवळ डि.टी. शेजवळ, बि.के.ऊफाडे, विक्की शेजवळ कांचन सदाशिवे,जया गजभिये, अ‍ॅड. पुष्पा घोडके आदिनी अभिनंदन करुन पुढिल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# शेवगाव येथे गेवराई रोडवर गोळीबार

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** येथील गेवराई रोडवरील एका रसवंती गृहासमोर दि. 3 रोजी रविवारी झालेल्या गोळीबाराच्या घटनेने तालुक्यात खळबळ उडाली आहे.
याबाबत सविस्तर वृत्त असे की, दि. 3 रोजी शहरातील शेवगाव - गेवराई रस्त्यावर दोन दुचाक्यावर आलेल्या चार इसमापैकी एकाने गावठी कट्ट्यातून गोळीबार केला. मात्र या गोळीबारात कोणीही जखमी झाले नाही. गोळीबारानंतर दुचाकीवर आलेले गेवराईकडे पळून जात असतांना बाभुळगावफाटा येथे एक दुचाकीला मागून धडक दिल्याने एक जण जखमी झाला. तर ज्याच्यावर गोळीबार केला त्याच्या हाताला जखम झाल्याने दोघांना अहमदनगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे एक कट्टा पोलिसांनी ताब्यात घेतला. याप्रकरणी रात्री उशीरापर्यंत शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नाही.
पोलीस यंत्रणेकडून मिळालेल्या प्राथमिक माहिती नुसार या घटनेतील एका जखमीला नगर येथे उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. सध्या तो अत्यावस्थेत असल्याने त्याचा जबाब घेता आला नाही. पुढील उपचारासाठी त्याला पुण्याला हलविल्याची माहिती आहे, असे पोलिसांनी सांगितले. दरम्यान त्याची प्रकृती खालावल्याने त्या जखलीला पुण्याला हलविण्यात आल्याची माहिती अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी दिली. तर दुसऱ्याला येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. याबाबत अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी सांगितले की, या घटनेतील अत्यावस्थेत असलेल्या इसमाचे नावं अर्जुन पवार असून त्याच्या जखमी साथीदार राकेश राठोड हे दोघे यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथील आहेत. या घटनेशी संबंधित पुण्यातील दोन फरार आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.
शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिगंबर भदाणे हे सुट्टीवर असल्याने पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्याकडे पदभार देण्यात आला आहे. रात्री आठ वाजता अपर पोलिस अधीक्षक प्रशांत खैरे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील, पाथर्डीचे पोलिस निरीक्षक संदीप मुटकुळे, सहायक पोलिस निरीक्षक अनिल बागूल, रामेश्वर कार्यदे, अमोल पवार, सहायक फौजदार भास्कर बालवे, परशुराम नाकाडे, बप्पासाहेब धाकतोडे, अमोल गुंजाळ, संपत खेडकर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

# शेतीच्या वादातून भाऊबंद माझ्या परिवाराचा किंवा माझा जीव घेणार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार पोलीस ठाणे हद्दीतील बाभुळगाव येथील रहिवासी सुर्यभान नामदेव मोरे वय 57 वर्षे यांच्याशी दिनांक 13 एप्रिल 2022 रोजी भाऊबंदकी मधील मुरलीधर नामदेव मोरे, दौलत नामदेव मोरे, संजीव नामदेव मोरे व राजू नामदेव मोरे राहणार सर्व बाभुळगाव यांनी लिहा येथे मारोती मंदिरासमोर या सर्वांनी संगणमत करून शिवीगाळ करून धक्काबुक्की केली व आमची जमीन आम्हाला दे नसता तुला जिवाशी ठार मारू अशी धमकी दिली होती. या प्रकरणी वडोद बाजार पोलीस ठाण्यात या चौघा विरोधात भारतीय दंड संहिता 1860 अधिनियम नुसार कलम 323, 504, 506, 34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तसेच दिनांक 7 मे 2022 रोजी सुर्यभान मोरे यांच्या शेत गट नंबर 53 मध्ये सामाईक बांध फोडून ट्रॅक्टर घालून कोथिंबीर पिकाचे नुकसान केले म्हणून बोलण्यास गेले असता आजिनाथ एकनाथ मोरे यांनी शिवीगाळ करत पुन्हा माझ्या नादाला लागला तर तुला जिवंत सोडणार नाही असे धमकावले असता वडोद बाजार पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता 1860 अधिनियम नुसार कलम 427, 504, 506 नुसार आजिनाथ मोरे यांच्या वर गुन्हा दाखल करण्यात आला होता. दिनांक 10 जुन 2023 रोजी सुद्धा शेतीच्या वादातून कोर्टात केलेली केस परत घे म्हणत मारोती मंदिरासमोर चापट बुक्याने मारहाण केली व जिवे ठार करू असे म्हटले तेव्हा हि पोलीस ठाण्यात 323, 504, 506, 34 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आणि पुन्हा दिनांक 13 फेब्रुवारी 2024 रोजी अजिनाथ एकनाथ मोरे, रामेश्वर कारभारी मोरे, सुमित्रा अजिनाथ मोरे, संगीता विठ्ठल मोरे, यांनी सुर्यभान मोरे यांच्या बैलगाडीला आडवे येत येथून जायचे नाही म्हणत खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारण्यास सुरुवात केली यावेळी सुर्यभान मोरे यांची बायको भांडण सोडविण्यासाठी आली असता यांना सुद्धा मारहाण करण्यात आली. अशा प्रकारे वांरवार भांडण होत आहे व जिवे ठार करण्याचे धमक्यांच्या तक्रारी वडोद बाजार पोलीस ठाण्यात देऊन सुध्दा या लोकांवर पोलीस कोणतेच पाबंदी करत नाही तर यांना समज देत नाही मला धमक्या देणार्या इसमांशी पोलीस हात मिळवणी करून त्यांच्या छत्रछायेखाली बसत आहे, आमच्या जिवाचे बरे वाईट झाले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी वरील नमूद ईसमावर राहिल असे सुर्यभान नामदेव मोरे यांनी दिनांक 20 फेब्रुवारी रोजी लेखी तक्रार पोलीस अधीक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे दिली आहे.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर